cmyk

## संपादकीय

### शिक्षणाचे व्यापारीकरण : चिंतेची बाब

विद्यापीठ अनुदान आयोगाने ७ जानेवारी २०२५ रोजी कुलगुरू, प्राध्यापक इत्यादींच्या नेमणकीच्या संदर्भात अधिसूचना काढली आहे. त्यावर ५ फेब्रुवारीपर्यंत जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. या अधिसूचनेची पाळेमुळे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 मध्ये आहेत. या शैक्षणिक धोरणाचा शाब्दिक व भाषेचा फुलोरा काहीही असला, तरी या धोरणात शिक्षणाच्या खासगीकरणाला, व्यापारीकरणाला, कंपनीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. शिक्षणात परदेशी भांडवलाचे स्वागत व प्रोत्साहन देण्यात आले आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com






बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८२ | मंगळवार, दि.४ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये








cmyk

## अग्रलेख

# शिक्षणाचे व्यापारीकरण : चिंतेची बाब

विद्यापीठ अनुदान आयोगाने ७ जानेवारी २०२५ रोजी कुलगुरू, प्राध्यापक इत्यादींच्या नेमणकीच्या संदर्भात अधिसूचना काढली आहे. त्यावर ५ फेब्रुवारीपर्यंत जनतेकडून सूचना मागवल्या आहेत. या अधिसूचनेची पाळेमुळे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आहेत. या शैक्षणिक धोरणाचा शाब्दिक व भाषेचा फुलोरा काहीही असला, तरी या धोरणात शिक्षणाच्या खासगीकरणाला, व्यापारीकरणाला, कंपनीकरणाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. शिक्षणात परदेशी भांडवलाचे स्वागत व प्रोत्साहन देण्यात आले आहे.

एकदा का शिक्षणाचे व्यापारीकरण झाले व शिक्षण संस्था व कारखाना किंवा उद्योग–व्यवसाय यात काही फरक नाही असे मानले की, मग शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन व्यापारी पद्धतीने नफा/तोटा याचा विचार करून पुढचा टप्पा येतो. तेच विद्यापीठ अनुदान आयोगाने केले आहे. कस्तुरीरंगन समितीने आपल्या अहवालात शब्दबंबाळ भाषेत व मोघम पद्धतीने 'गव्हर्नन्स' व नेतृत्व यावर एक मोठे प्रकरण लिहिले आहे. कुलगुरू/संचालक हा उच्च शिक्षण संस्थांचा 'चीफ एक्झिक्युटिव्ह' आहे, असे त्यांनी म्हटले आहे. हा केवळ शाब्दिक बदल नाही, तर तो दृष्टिकोनातला बदल आहे, ही चिंतेची बाब आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जे लागू झाले त्याची चर्चा लोकसभेत व राज्यसभेत झाली नाही. केवळ केंद्रीय मंत्रिमंडळांनी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यात लोकसहभागाचा दिखावा करून 'मॅन्युफॅक्चर्ड कन्सेंट' घेण्यात आली होती. 'शिक्षण' हा सामायिक सूचीतील विषय असूनही राज्यांना विश्वासात घेतले जात नाही म्हणून चार–पाच राज्यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करायला नकार दिला आहे. तरीही या धोरणाची अंमलबजावणी केंद्र सरकार रेटून करत आहे हा प्रकार 'संघराज्य' मूल्य पायदळी तुडवण्यासारखे आहे. या धोरणातला पुढचा टप्पा म्हणजे राज्यपाल व राज्य सरकारे यांच्यातील मतभेद. या वादाचे राजकीय भांडवल केले जात आहे, असा आरोप होत असला तरी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या भूमिकेबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. तेव्हा राज्यपालांच्या भूमिकेबद्दल शंका घ्यायला पूर्ण वाव राहतो. राज्यपाल संविधानिक तटस्थता न पाळता केंद्रातील सत्ताधारी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी म्हणून काम करताना दिसतात. त्यातून वादाला सुरुवात होते. राज्यपाल हे राज्य विद्यापीठांचे कुलपती असतात. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमातून कुलपतींच्या मार्फत केंद्र सरकार भारतातील सुमारे ४४५ राज्य विद्यापीठांवर नियंत्रण आणू पाहत आहे, अशी शंका आणि आरोप केला जात आहे व चार–पाच राज्य सरकारांनी या नव्या नियमांना विरोध दर्शविला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमात कुलगुरूपदाची अर्हता व निवड समितीच्या सदस्यांचे संघटन पद्धत बदलली आहे. केंद्रीय विद्यापीठे व संस्था यांच्या कुलगुरूपदाच्या निवडीचे अधिकार राष्ट्रपती यांच्याकडे कुलपती म्हणून असतात. म्हणजेच त्याचे अधिकार केंद्र सरकारकडे असतात. पण भारतात जवळजवळ ४४५ राज्य विद्यापीठे आहेत. स्थानिक परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेऊन राज्य सरकारने स्वतःच्या उत्पन्नातून राज्य विद्यापीठे स्थापन करतात, कारण शिक्षण हा सामाईक यादीतील विषय आहे. राज्य सरकारे स्वतःचा विद्यापीठ कायदा अंमलात आणतात. त्यामुळे राज्या–राज्यांच्या विद्यापीठांच्या कायद्यात काही फरकही दिसून येतात.

विद्यापीठ अनुदान आयोगाने नव्या परिपत्रकात जाहीर केलेल्या कुलगुरू पदासाठी अर्हता अशा आहेत, उच्च दर्जाची शैक्षणिक पात्रता असलेली, प्रशासकीय अनुभव व नेतृत्व क्षमता असलेली, नामांकित व्यक्ती, संविधानिक मूल्य व सामाजिक उत्तरदायित्व असलेली, टीमवर्क करणारी, जागतिक दृष्टी व नवनिर्मितीचा दृष्टिकोन असणारी व्यक्ती कुलगुरू पदाला पात्र आहे. त्याला एक, उच्च शिक्षणात प्रोफेसर पदावर काम करण्याचा दहा वर्षांचा अनुभव असावा किंवा दोन, नामांकित शैक्षणिक व संशोधन संस्थेत उच्च व्यवस्थापनाचा अनुभव असावा किंवा तीन, उद्योग, कारखाने, सार्वजनिक व्यवस्थापन, सार्वजनिक क्षेत्राचे धोरण व व्यवस्थापन याचा अनुभव व महत्त्वपूर्ण शैक्षणिक किंवा विद्वत्तापूर्ण योगदान केलेली व्यक्ती असावी.

कायद्यानुसार, राज्यपाल जे कुलपती असतात ते कुलगुरूंच्या निवडीसाठी निवड समिती स्थापन करतात व निवड समिती पाच नावे कुलपतींना सुचवतात व कुलपती कुलगुरूंची अंतिम निवड करतात. निवड समितीच्या संघटित करण्याच्या पद्धतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने बदल सुचवले आहेत. प्रस्तावित बदलाप्रमाणे कुलगुरू पदाच्या उमेदवाराने तीनपैकी कोणतेही एक अट पूर्ण केली तरी चालण्यासारखे आहे. कारण, प्रत्येक अटीच्या शेवटी 'किंवा' हा शब्द वापरला गेला आहे. त्यामुळे शिक्षणक्षेत्राच्या बाहेरचा उद्योग–व्यवसायातील व्यक्तीला कुलगुरू करण्याचा मार्ग व यातून मोकळा झाला आहे. भारतातील सामाजिक व्यवस्थेला जाती व्यवस्थेची व त्या अनुषंगाने आर्थिक व सामाजिक शोषणाची बाजू आहे हे लक्षात न घेता व्यापारी पद्धतीने शिक्षणाचे व्यवस्थापन करणे म्हणजे जनतेला शिक्षणाचा हक्क नाकारणे होते याचा अनुभव आज अभिजनवादी उच्च शिक्षण संस्थांमध्ये येत आहे. उच्च शिक्षणातून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुली, भटके–विमुक्त हे सामाजिक उपेक्षित वर्ग हद्दपार होत आहेत व जे चिकाटीने पुढे जातात त्यांचा रोहित येमुला, पायल तडवी होतो. त्यामुळे उद्योग, व्यापार क्षेत्रातील व्यक्तीला कुलगुरू पदासाठी पात्र धरणे सामाजिकदृष्ट्या योग्य होणार नाही.

---

## पान ६ वरून...

### भारतरत्न लता मंगेशकर

कलावंतांच्या उपस्थितीमध्ये संपन्न होत असलेल्या गान कोकिळा स्वरलता या कार्यक्रमासाठी सर्व रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, ज्येष्ठ पत्रकार दत्ता आंबेकर , रो.कल्याण काळे,रो. धनराज सोळंकी, प्रशांत लाटकर, संपादक परमेश्वर गीते, बळीराम चोपणे, अनंत आरसुडे, कलाकार कट्टा अंबाजोगाई रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

-------------

### हमीदखान पठाण यांना

अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते प्रदान केला हमीदखान पठाण पत्रकारिताच्या माध्यमातून यांनी लोक सहभागातून दुष्काळात शुध्द पिण्यासाठी पाणी वाटप,कोवीड १९ मध्ये किराणा , असंघटित कामगारांसाठी वेळोवेळी आवाज उठवून कामगारांना शासकीय मदत मिळून देणे. सोबत भ्रष्टाचार निर्मूलन समिती , माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ तालुकाध्यक्ष असल्याने वेळोवेळी भ्रष्टाचारा विरुद्ध आवाज उठवून भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न.

१५ वर्षापासून हमीदखान पठाण यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून पाणी,अन्न, आरोग्य, शैक्षणिक असे विषयांमध्ये केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना गंगाई –बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रातील नामवंतांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

------------

### दिंद्रुडमध्ये भक्तिमय वातावरणात

लाड,बुधवार रोजी विठ्ठल महाराज आश्रम गंगापूर, गुरुवारी एकनाथ महाराज माने, शुक्रवारी अच्युत महाराज दस्तापुरकर, शनिवारी जयेश महाराज भाग्यवंत यांची कीर्तन सेवा होणार आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त दिनांक ८ रोजी हभप हरिदास महाराज पवार यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत होईल व रविवार दिनांक ९ रोजी सकाळी ९ ते ११ भरत महाराज चौधरी यांचे काल्याचे किर्तन होईल व काल्याच्या कीर्तनानंतर समस्त गावकऱ्यांच्या वतीने महाप्रसाद होईल.या सप्ताह मध्ये युवकांसह ज्येष्ठ भाविक भक्त यजमान मध्ये पांडूरंग एकनाथ काकडे, मच्छिंद्र बापूराव शिंदे, गोविंद बालासाहेब ठोंबरे, बालासाहेब रामकृष्ण ठोंबरे,इंजि गणेश महादेव पवने, चंद्रकांत बाजीराव ठोंबरे, निलेश भगवान ठोंबरे,सोमा श्रीमंत चव्हाण, गोवर्धन गणपण ठोंबरे यांनी किर्तन यजमान सेवा घेतली आहे . सप्ताहात दररोज भाविक भक्त तीन वेळा अन्नदान पंगत करत आहेत. महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांसह भजनी मंडळ, गायक, मृंदागाचार्य यांचा समावेश असणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताह उपस्थित राहून कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक खोलेश्वर तरुण मित्र मंडळ व दिंद्रुड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

-------------

### आ. सुरेश आण्णा धस

सामाजिक कार्यकर्ते शेषराव आढाव,युवा उद्योजक तथा सुरेश आण्णा धस युवामंचाचे तात्यासाहेब जरे, ग्रामपंचायत सदस्य अमोल भैय्या डोके,संदिप (भैय्या) धोत्रे, विनोद समुद्रे, सोमनाथ समुद्रे, मुख्याध्यापक पठाडे सर, होगाडे सर, नागरगोजे सर, माने सर, महाव्दार सर, श्रीमती डमाळे मॅडम, श्रीमती मनीषा इंगळे मॅडम, राजेंद्र भोसले सर आदी मान्यवर उपस्थित होते. युवा उद्योजक तथा सुरेश आण्णा धस युवामंचाचे तात्यासाहेब जरे व ग्रामपंचायत सदस्य अमोल भैय्या डोके यांनी आपल्या नेत्याचा वाढदिवस स्तुत्य उपक्रमाने साजरा केल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार असून त्यामुळे आण्णा व आपल्या विषयी विद्यार्थ्यांच्या मनात आदर राहणर असल्याचे मत मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तात्यासाहेब जरे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन श्री मधुकर गळगटे सर यांनी केले तर आभार जेष्ठ शिक्षक महाव्दार सर यांनी मानले.

----------

### चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री

भरतीचे प्रमोद वझे, बाळू सौंदतिकर यांच्यासह असंख्य कलाकार उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे या तिघांनी मिळून सर्व मान्यवरांचे सत्कार करून आपल्या भाषणात स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना शुभेच्छा दिल्या. काल दि. ३ रोजी समूह नृत्य मराठी माध्यम इयत्ता ४ थी ते दहावी वयोगटाच्या समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या. याबरोबरच एकपात्री अभिनय स्पर्धा देखील संपन्न झाली.

**बाल कलाकारांचा चंपावती महोत्सव कायम सुरु ठेऊ– जगताप, मुळूक, गलधर**

बीड रंगभूमीला कलेचा मोठा वारसा लाभलेला आहे. हा कलेचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी कलाकारांना पाठबळ देण्याचा आमचा निर्धार पक्का आहे. निवडणूक आणि राजकारणासाठी आम्ही चंपावती महोत्सव आयोजित करत नाहीत आणि कधी करणार नाहीत. बीडमध्ये प्रतिभासंपन्न कलाकार तयार होत राहावेत आणि कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा ही ओळख अबाधित राहावी यासाठी आम्ही प्रतवर्षी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधून बीडमध्ये चंपावती महोत्सव आयोजित करत राहणार आहोत असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले.

--------------



**माजलगाव:– आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्रभर सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आलेले होतें सदरील दिंडीचे आगमन दिनांक ०३ फेब्रुवारी सोमवार रोजी दुपारी ठीक ३:०० वाजता छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव या ठिकाणी झाले असता सदरील दिंडीमध्ये माजलगाव अर्बन परिवाराच्या वतीने सर्व सहकार्यानी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.**

# खुंटेफळ साठवण तलाव संपादित जमीन धारकांना सानुग्रह अनुदान द्या : थोरवे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री येत आहेत ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट. मुख्यमंत्री साहेबांकडून आदरणीय आमदार साहेबांनी खुंटेफळ साठवण तलावासाठी सन २०१३ पूर्वी संपादित करण्यात आलेल्या १९१ हेक्टर जमीनधारकांना (५४ कोटी) सानुग्रह अनुदान (हेक्टरी २८ लाख रु) मिळऊन द्या– प्रदिप थोरवे कृष्णा भिमा स्थिरीकरण योजने अंतर्गत खुंटेफळ (पुंडी) ता.आष्टी, जि.बीड. येथे साठवण तलावाचे बोगदा भूमिपूजन आणि पाइपलाइन पाहण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी



फडणवीस ५ तारखेला येत आहेत. ह्या तलावाचे कामकाज जवळपास १४ वर्षापूर्वी सुरू झाले आहे व मधे काही वर्ष काम बंद होते. तसेच तलावासाठी खुंटेफळ,पुंडी व सोलापुरवाडी या गावातील जमीन शासनाला साठवण तलावासाठी खरेदी दिल्या आहेत.ज्या शेतकर्यांनी साठवण तलावासाठी सर्वात आधी २०१३ पुर्वी शासनास जमिन दिलेली आहे,त्यांची जमिन शासनाने ७ लाख रु हेक्टर ने घेतली आहे व सध्या राहीलेल्या शेतकर्यांची जमीन ३५ लाख रु हेक्टर ने घेण्यात येत आहे म्हणुन शासनाने आधीच्या शेतकऱ्यांनी सानुग्रह अनुदान तथा भावनीक रक्कम फरक म्हणुन २८ लाख रु प्रती हेक्टरी देण्यात यावी.या शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी शासनाला अंदाजे फक्त ५४ कोटी रु अतिरिक्त द्यावे लागतील.एकाच प्रकल्पासाठी आधीच्या गोरगरीब शेतकर्यांना शासनाकडून वेगळा न्याय व आताच्या शेतकर्यांना वेगळा न्याय भेटत असुन सरकार याकडे पुर्णपने दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत खेदाची बाब आहे.नवनिर्वाचित आमदार सुरेश अण्णा धस साहेब यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणविस यांच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आप नेते प्रदिप थोरवे यांनी आ.सुरेश धस यांच्यासमोर आपल्या भाषणात केली आहे व निवेदनही दिले आहे.

# पर्यवेक्षिका चंद्रकला परसोडे/जाधव यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील चंद्रकला पांडुरंग परसोडे (जाधव मॅडम) या दि ३१ जानेवारी रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवपुर्ती गौरव सोहळा धारुर तालुका अंगणवाडी मदतनीस कर्मचारी संघटनेच्या वतीने दि ०१ फेब्रुवारी रोजी धारुर तालुक्यातील हिंगणी येथे संपन्न झाला.



चंद्रकला परसोडे (जाधव मॅडम ) या अंगणवाडी पर्यवेक्षिका या धारुर तालुक्यातील मोहखेड व तेलगाव विभाग येथे कार्यरत होत्या.त्या नियत वयोमानानुसार दि ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारुर तालुका अंगणवाडी व मदतनीस कर्मचारी संघटनेच्या वतीने दि ०१ फेब्रुवारी रोजी धारुर तालुक्यातील हिंगणी येथे संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून हिंगणी येथील सरपंच योगेश सोळंके यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य बाळराजे सोळंके, वंचीत बहुजन आघाडीचे जिल्हा कोषाध्यक्ष अंकुशराव जाधव, अंगणवाडी मदतनीस कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती शामलताई जोगदंड,तलाठी शेजाळ,विकास वाव्हळे, सेवानिवृत्त सौनिक दत्तात्रय वाव्हळे,रंजित रुपणर,बाळासाहेब चोपडे,रवी उजगरे,अशोक पैठ यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी चंद्रकला परसोडे यांना सेवापुर्ती सोहळ्या निमित्ताने शिक्षक सिध्दार्थ जाधव,करुणा टाकणखार, मिनाक्षी जावळे,किरण प्रधान, बनसोडे मॅडम यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एस.बी.आय. फाऊंडेशनचे एकनाथ शिंदे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माया डोंगरे,सुमनबाई बडे,विजयमाला कांबळे,सरस्वती पुरी,विद्या सोळंके,प्रभावती शिंदे,संगिता जाधव,सुरेखा निर्मळ,उषा तिडके,प्रतिक जाधव व तेलगाव विभागातील अंगणवाडी सेविकांनी परिश्रम घेतले.यावेळी हिंगणी ग्रामस्थांसह महिलांची मोठ्या प्रमाणावर उपस्थीती होती.

अंगणवाड्याना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे वाटप

हिंगणी येथील सेवापुर्ती सोहळ्यात चंद्रकला परसोडे (जाधव मॅडम) यांच्याकडून धारुर तालुक्यातील मोहखेड विभागातील सर्व आंगणवाड्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे वाटप करण्यात आले.

# माजलगावात प्रथमच महाराष्ट्र शासन आयोजित भारुड महोत्सव संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित भारुड महोत्सव दि. २९ ते ३१ जानेवारी दरम्यान येथील मॉ वैष्णवी मंगल कार्यालयात संपन्न झाला.



या भारुड महोत्सवात ख्यातनाम राष्ट्रीय भारुडकार श्रीमती चंदाताई तिवाडी, संतोष भालेराव, श्रीमती कृष्णा उळेकर, सय्यद हमीद, अनिल केंगार, श्रीमती संध्या साखी, महादेव शेंडे, शेखर भाकरे, जननी देवी भजनी मंडळ (गोळेवाडी ता भोर जिल्हा पुणे), लक्ष्मण राजगुरू, श्रीमती धनश्री जोशी, जगन्नाथ खरात, नारायण देव भजनी व भारुड मंडळ (भालगुडी ता मुळशी जिल्हा पुणे), यांनी तीन दिवसांत शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या समस्या, व्यथा, स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह, व्यसनमुक्ती, महिला सबलीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, पाणी बचत, मुलींचे शिक्षण यांसारख्या विविध विषयांवर भारुडातून समाजाचे प्रबोधन केले. यावेळी विशेष उपस्थितीत विकास खारगे (भा प्र से– मुख्यमंत्री अप्पर मुख्य सचिव तथा अप्पर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई), बिभीषण चवरे (संचालक– सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई), संजय अमृतराव (सहायक लेखाधिकारी– सांस्कृतिक कार्य विभाग छत्रपती संभाजीनगर), गौरव इंगोले (उपविभागीय अधिकारी– माजलगाव), श्री बी धिरज कुमार पोलीस उप अधिक्षक माजलगाव मा. आ. मोहनराव काका सोळंके, गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी इत्यादी मान्यवर उपस्थित होते तसेच माजलगाव शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अप्रतिम ठरलेल्या भारुड महोत्सवाच लाभ घेतला.

यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय भारुडकार यांनी भारुड याविषयावर मार्गदर्शन केले. या भारुडाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने झाली, महाराष्ट्र राज्य गीत चैतन्य आहेर यांनी सादर केले. भारुड महोत्सवाचे प्रास्ताविक पंडित मेंडके यांनी केले, आभार अरुण सोळंके, सुत्रसंचलन अशोक वाडेकर, अरुण सोळंके यांनी केले.

# नवकेशर नृत्य महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद : नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमीने नवप्रतिभांना मिळवून दिले सशक्त व्यासपीठ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येथील नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमीने नेहमीप्रमाणेच पुढाकार घेत भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त अंबाजोगाईत नवकेशर नृत्य महोत्सवाअंतर्गत वैयक्तिक व समुहनृत्य, गायन स्पर्धांचे आयोजन केले होते. विविध वयोगटातील ५७० स्पर्धकांनी या स्पर्धेस उत्स्फूर्त दिला. तर उपस्थितांनी भरभरून दाद दिली.**




बक्षीस वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून दीनदयाळ बँकेच्या माजी अध्यक्षा व विद्यमान संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सामाजिक कार्यकर्ते संभाजीराव लांडे, उद्योजक सुरेशराव मोदी, उद्योजक मोईन शेख, आयोजक भिमाशंकर शिंदे व प्रा.आरती भिमाशंकर शिंदे या मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावर्षी पासून प्रथमच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगळवार, दिनांक २८ जानेवारी रोजी आद्यकवि मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी नवकेशर नृत्य महोत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत. वैयक्तिक नृत्य गट – इयत्ता १ ली ते ४ थी मानवी पतंगे (प्रथम), रूही बडे (द्वितीय), मधुरा चिंचोलकर (तृतीय) तर समृध्दी काकडे व संध्या मुजमुले (उत्तेजनार्थ) आणि वैयक्तिक नृत्य गट – इयत्ता ५ वी ते १० वी स्वरनिका वांजरखेडकर (प्रथम), वसुंधरा काशीद (द्वितीय), गीता उकरे (तृतीय), अन्वी रांदड व विराज वागडोळे (उत्तेजनार्थ) तसेच वैयक्तिक नृत्य गट – खुला अश्विनी यादव (प्रथम), अश्विनी शिंदे (द्वितीय). समूह नृत्य गट – इयत्ता १ ली ते ४ थी प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई (प्रथम), स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर, अंबाजोगाई (द्वितीय), घाटनागनाथ प्राथमिक विद्यालय, अंबाजोगाई (तृतीय) तर उत्तेजनार्थ पारितोषिक – १) कै.वसंतराव काळे पब्लिक स्कूल आणि २) सृजन प्राथमिक विद्यालय, चनई यांना देण्यात आले. समूह नृत्य गट – इयत्ता ५ वी ते १० वी स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर, अंबाजोगाई (प्रथम), प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई (द्वितीय), सृजन प्राथमिक विद्यालय, चनई (तृतीय) आणि उत्तेजनार्थ पारितोषिक १) जोधाप्रसादजी मोदी विद्यालय व २) मुक्तांगण विद्यालय यांनी पटकाविले. समुह नृत्य गट खुला – प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई (प्रथम) तर समुह नृत्य गट – दिव्यांग – मानव विकास मूकबधीर विद्यालय अंबाजोगाई (प्रथम), बाबासाहेब परांजपे दिव्यांग विद्यालय अंबाजोगाई (द्वितीय), कर्तव्य मतिमंद मुलींचे निवासी विद्यालय, अंबाजोगाई (तृतीय) तर उत्तेजनार्थ पारितोषिक – १) सेवा मतिमंद मुलांची शेतकी कार्यशाळा, धानोरा, २) ज्ञानसागर कर्णबधिर निवासी विद्यालय, भारज पाटी या संघांनी पटकाविले. नवकेशर गीत गायन स्पर्धेत नंदिनी कुलकर्णी (प्रथम), अश्विनी सौंदळे (द्वितीय), गिता देशमुख (तृतीय) तर आत्मजा परतवाडे आणि सोहम सचिन मोरे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. हे या स्पर्धेचे पहिले वर्ष होते. या स्पर्धा ४ गटांत उत्कृष्टरित्या आयोजित करण्यात आल्या होत्या. नृत्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून नृत्य परिक्षक कपिल भरणे (परभणी) आणि आशिष झाडके (धाराशिव) यांनी परिक्षण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिमाशंकर शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा.अनंत कांबळे व गणेश तौर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार प्रा.आरती भिमाशंकर शिंदे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी आयोजक भिमाशंकर शिंदे, संयोजन समितीचे प्रा.अनंत कांबळे, गणेश तौर, सुशिल कुंबेफळकर, विक्रमसेन आगळे, सुनिल व्यवहारे, बळीराम उपाडे, बाळासाहेब वरणे, गोविंद जगधने, प्रविण जोगदंड यांच्यासह नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमी, अंबाजोगाई यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. भव्य वैयक्तिक व समुहनृत्य, गायन स्पर्धेत अंबाजोगाई शहर व परिसरातील अनेक शाळांतील एकूण ५७० विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पारीतोषिक वितरण सोहळ्यापूर्वी विजेत्या स्पर्धक व सहभागी संघांनी राष्ट्रभक्तीपर गीत, गोंधळ, भारूड, पोवाडा, बॉलिवूड, सेमी क्लासिकल, वेस्टर्न, हिप हॉप, शेतकरी गीत, आदिवासी नृत्य, गुजराती नृत्य, पारंपारिक लावणीचे अप्रतिम वैयक्तिक व समुह नृत्याविष्कार सादर करून, गीत गायन करून उपस्थितांची मने जिंकली. शहरात मागील १७ वर्षांपासून नवकेशर डान्स ॲण्ड ड्रामा अकॅडमीच्या वतीने अंबाजोगाईचा सांस्कृतिक वसा आणि वारसा जोपासत आहोत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्यपूर्ण विधायक प्रयत्न करण्यात येत आहेत. अकॅडमीच्या अनेक विद्यार्थ्यांनी विश्व, देश, राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुकास्तरीय विविध वैयक्तिक व समुह नृत्य स्पर्धांच्या माध्यमातून सहभागी होवून उज्ज्वल यश संपादन करीत अंबाजोगाईचे नांव उंचावले आहे. लवकरच माता श्री योगेश्वरी देवीचा महिमा सांगणारे मराठी गीत व व्हिडिओ अल्बम निर्मिती करणार आहोत. यापुढील काळातही नृत्य क्षेत्रात नवप्रतिभांना योग्य संधी उपलब्ध व्हावी यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून नवे व्यासपीठ आणि मंच उपलब्ध करून दिला आहे.

cmyk



## त्यांच्या पोटातील ओठावर आले–जरांगे पाटील

जालनाः जे दिसायला हवे होते ते राज्याला ते दिसले आहे. आम्हाला जातीयवादी ठरवत होते. ज्या ठिकाणाहून अपेक्षा नव्हती तिथून जातीयवाद सुरू झाला. त्यांचे शब्द चुकीचे होते. विखारी होते. जातीय होते. आरोपींची बाजू घेऊन त्यांची मानसिकता तपासायची आणि संतोष भैय्याच्या मागे राहायचे नाही, हे विखारी शब्द लोकांनी पाहिले. राज्य हळहळले. ज्या ठिकाणाहून अपेक्षा नव्हती तिथून हे शब्द आलेच कसे? एखादा नेता किंवा कार्यकर्त्याकडून एखादा शब्द जात असतो. पण उच्चकोटीच्या व्यक्तीने असे बोलणे महाराष्ट्राचे मोठे दुर्दैव आहे. या निमित्ताने पोटातील विचार ओठावर आले. राज्याने प्रत्यक्ष पाहिले, असे म्हणत मनोज जरांगे यांनी नामदेव शास्त्रींवर तिखट शब्दात टीका केली. वाल्मिक कराड हे राज्याचे अन्नपुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याने मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी सतत केली जात आहे. असे असताना काही दिवसापूर्वी धनंजय मुंडे हे भगवानगडावर मुक्कामी गेले होते. त्यानंतर या प्रकरणात भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी उडी घेत धनंजय मुंडे यांची पाठराखण केली. त्यानंतर त्यांच्यावर देखील अनेकांनी टीका केल्याचे दिसून आले. नंतर धनंजय देशमुख आणि वैभवी देशमुख यांनी महंत नामदेव शास्त्री यांची भगवान गडावर भेट घेतली. यावेळी त्यांनी नामदेव शास्त्री यांना सर्व पुरावे दाखवले. तसेच संतोष देशमुख यांची हत्या का झाली? या हत्यामागे कोण होते? याचा लेखाजोखाच त्यांच्यासमोर मांडला. यावेळी नामदेव शास्त्री यांनी भगवान गड हा देशमुख कुटुंबीयांच्या पाठिशी असल्याचे स्पष्ट केले. या भेटीवर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५




# मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला ६५ हजार लोक येणार

## मुंडे बहिण– भावांच्या उपस्थितीबाबत आ.सुरेश धसांचे मोठे विधान





आष्टी । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यावर

**पहिल्यांदाच बीड जिल्ह्यात जनतेतील कार्यक्रमाला येत आहेत. खुंटेफळ धरणाच्या बोगद्याच्या प्रकल्पाच्या कामाच्या शुभारंभासाठी ते येणार असून १.६८ टीएमसी पाणी येथील शेतकऱ्यांना मिळणार आहे. तर याच कार्यक्रमाच्या मुंडे बहिण–भावाच्या उपस्थितीबाबत आ. सुरेश धस यांनी मोठे विधान केले आहे. या कार्यक्रमासाठी ६५ हजार लोक येणार असून कार्यक्रमाची जय्यत तयारी झाली असल्याची माहिती आ. सुरेश धस यांनी दिली आहे.**

सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण व खंडणीप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडमुळे सध्या बीड जिल्हा राज्याच्या केंद्रस्थानी आहे. त्यातच, महायुतीमधील भाजप आमदार सुरेश धस यांनी वाल्मिक कराड व मंत्री धनंजय मुंडेविरुद्ध आरोपींचे गौप्यस्फोट करत राजकीय धुरळा उडवून दिला आहे. त्यामुळे, मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. एकीकडे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत असतानाच दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड दौऱ्यावर जात आहेत. मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच ते बीड दौऱ्यावर असून आमदार सुरेश धस यांनी त्यांच्या कार्यक्रमाबाबतची माहिती दिली. तसेच, या बैठकीला बीड जिल्ह्यातील दोन्ही मंत्री उपस्थित राहणार का, या प्रश्नावर त्यांनी थेट उत्तर देणे टाळले, तर मुंडे बंधु–भगिनींबाबत मोठे वक्तव्य केले आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्यांदाच बीड जिल्ह्यात जनतेतील कार्यक्रमाला येत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांचे जिल्ह्यात जोरदार स्वागत करणार असून ६५ हजार लोक या कार्यक्रमाला येणार आहेत, अशी माहिती आमदार धस यांनी दिली. मात्र, जिल्ह्यातील दोन मंत्री मुंडे बंधु–भगिनींबाबतच्या वक्तव्यावर त्यांनी मोठे वक्तव्य केले आहे. जिल्ह्यातील मंत्री आणण्याची आमची क्षमता नाही, पण जिल्ह्यातील दोन्ही मंत्र्यांची नावं पत्रिकेवर आहेत, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे. या कार्यक्रमानंतर मच्छिंद्रनाथाच्या समाधीवर मुख्यमंत्री दर्शनासाठी येणार आहेत. यावेळी, १० कोटी रुपयांच्या गाभाऱ्याचा शुभारंभ करणार आहेत, असेही धस यांनी म्हटले.

### आष्टी तालुक्यातील २८ हजार हेक्टर जमीन ओलीताखाली येणार

खुंटेफळ धरणाच्या बोगद्याच्या प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ होणार असून १.६८ टीएमसी पाणी येथील शेतकऱ्यांना मिळणार आहे. सन २००५-०६ पासून ही योजना आ. धस यांच्णया डोक्यात होती. या प्रकल्पामुळे आष्टी तालुक्यातील जवळपास २७ हजार ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीतील कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी मतदार संघासाठी हरितक्रांती ठरवणारी खुटेफळ साठवण तलाव योजना व शिंपोरा ते कुंटेफळ थेट पाईपलाईन योजनेचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांच्या शुभहस्ते बुधवारी ५ फेब्रुवारीला होणार या कार्यक्रमास मतदार संघातील कार्यकर्त्यांनी महिला भगिनी सह लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले आहे.**


आष्टी मतदार संघाला हरितक्रांतीकडे घेऊन जाणारी कुंटेफळ साठवतलाव योजना शिपोरा ते खुठेफळ पाईपलाईन योजनेसाठी आमदार सुरेश धस यांनी आपल्या राजकीय कार्यकर्ते मध्ये या योजनेसाठी अक्षरशा गावकऱ्यांचा तसेच आष्टीतील काही पुढाऱ्यांचा रोष पत्करला मात्र त्यांनी जिद्द सोडली नाही या योजनेसाठी अक्षरशा त्यांनी लोकांची दगडे खाल्ली ही योजना कार्यान्वित करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी या योजनेसाठी मोठे सहकार्य केले आहे त्यांच्याच शुभ हस्ते बुधवारी ५ फेब्रुवारीला कुंटेफळ साठवण तलाव व पाईपलाईन योजना व मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील मंदिर गाभारा व उद्घाटन संपन्न होणार आहे या आष्टी तालुक्यातील सर्वात मोठ्या महत्त्वकांक्षी योजनेच्या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याबरोबर विधान परिषद सभापती राम शिंदे सर तसेच अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमास मतदार संघातील




बंधू–भगिनींनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आष्टी मतदार संघाचे आमदार व या योजनेचे भागीरथ आमदार सुरेश धस यांनी केले. आणि जागतिक खो–खो स्पर्धेमध्ये जगज्जेतेपद मिळवलेल्या भारतीय संघातील सहभागी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील महिला व पुरुष संघातील खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली.याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या खुंटेफळ साठवण तलावाच्या थेट पाईपलाईन कामाची पाहणी आणि श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथील समाधी गाभारा भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते होणार असून याच कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापती पदी निवड झालेले प्राध्यापक राम शिंदे यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाचे सभापती पदी आपल्या परिसरातील लोकप्रतिनिधीची निवड झाली आहे याचा आनंद म्हणून या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. खुंटेफळ साठवण तलाव येथे शिंपोरा तालुका कर्जत येथून उजनी धरणाचे पाणी थेट पाईपलाईन द्वारे येणार असून या पाईपलाईन कामाची पाहणी आणि संपूर्ण भारत देशातून दरवर्षी भाविक भक्त मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी येत असतात असे प्रसिद्ध क्षेत्र असलेले श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ समाधीस्थळ असलेले मायंबा येथील समाधी मंदिराचे गाभाऱ्याचे नव्याने बांधकाम होणार असून या बांधकामाचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हस्ते होत असून या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे नवनियुक्त सभापती प्राध्यापक राम शिंदे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून यानिमित्ताने प्राध्यापक नामदार राम शिंदे यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. खुंटेफळ साठवण तलाव हा आपला ड्रीम प्रोजेक्ट असून आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील काही भागातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मराठवाड्याच्या हक्काचे ५.६८ टीएमसी पाण्यापैकी सध्या १.६८ टीएमसी मंजूर असून या प्रकल्पाद्वारे २८ हजार हेक्टर सिंचन होणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्याचे लक्ष या प्रकल्पाकडे लागून आहे. दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रम स्थळाची पाहणी आमदार सुरेश धस यांनी केली असून त्यांचे संपूर्ण कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कामाला लागल्याचे दिसून येत आहे सुमारे एक लक्ष जनसमुदाय या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावा यासाठी जय्यत तयारी सुरू आहे.

# अंजली दमानिया आज मोठा गौप्यस्फोट करणार

## भगवान गडावर जाऊन धनंजय मुंडेंचा राजीनामा मागणार; नामदेव शास्त्रींना पुरावे देणार



मुंबई । प्रतिनिधी

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरणासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया दि. ४ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषद घेणार आहे. या पत्रकार परिषदेत मोठा खुलासा करणार असल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. तसेच त्या भगवान गडावर जावून तेथे नामदेव शास्त्री यांची भेट घेऊन सर्व पुरावे देणार असून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, अशी विनंती करणार असल्याचे त्या म्हणाल्या.**

संतोष देशमुख खून प्रकरणानंतर अंजली दमानिया यांच्याकडून मंत्री धनंजय मुंडे यांना सातत्याने टार्गेट करण्यात येत असून वेळोवेळी वेगवेगळे मुद्दे त्या पुराव्यासह मांडत आहेत. त्यामुळे मुंडेंच्या अडचणीत वाढ होताना दिसत असून दि. ४ फेब्रुवारी रोजी दमानिया या कोणता गौप्यस्फोट करणार आहेत, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजता अंजली दमानिया या पत्रकार परिषद घेणार आहे. मात्र यापूर्वीच त्यांनी मोठे भाष्य केले आहे. पुरावे दाखवल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार धनंजय मुंडे यांची पाठराखण करणार नाहीत, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. तर तेच पुरावे भगवानगडावर स्वतः नेणार असल्याचे म्हणत धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी करणार असल्याचे अंजली दमानिया म्हणाल्या. तर जोपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा होत नाही तोपर्यंत सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळणार नसल्याचेही अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. प्रतिक्रिया देत भ्रष्टाचाराचे पुरावे पाहून मंत्रिपदाचा राजीनामा मिळेल अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. तर हे सगळे पुरावे अतिशय धक्कादायक आहेत, ते जनतेपुढे येतील, त्यानंतर नक्कीच मोठा निर्णय घ्यायला जनता सरकारला भाग पाडेल, असा विश्वास अजंली दमानिया यांनी व्यक्त केला.

### “ पत्रकार परिषदेनंतर फडणवीस, पवारच राजीनामा घेतील

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघेही धनंजय मुंडे यांचे मित्र असल्याने ते त्यांचा राजीनामा घेत नाहीत. अजितदादांना मी सर्व पुरावे दिले असूनही त्यांनी काहीच केले नाही. आता मंगळवारी पत्रकार परिषदेत सर्व पुरावे सादर केले जाणार असून त्यानंतर फडणवीस आणि पवार सुध्दा धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतील, असे अंजली दमानिया म्हणाल्या. तसेच पत्रकार परिषदेत सादर केलेले पुरावे भगवान गडावर जावून नामदेव शास्त्रींना दिले जाणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

## दिल्लीत प्रचार तोफा थंडावल्या, छुप्या प्रचारावर भर

नवी दिल्ली । वृतसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी सोमवारी प्रचार तोफा थंडावल्या. बुधवारी ५ फेब्रुवारीला मतदान होत आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी सर्वच पक्षांनी रोडशोवर भर दिला. दिल्ली विधानसभा मोठ्या प्रमाणात शहरी भाग आहे, काही ग्रामीण भागही आहे. झोपडपट्टीचा भाग शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. त्यामुळे सर्वपक्षीय नेत्यांनी प्रचारासाठी जाहीर सभांसह रोड शो, सोशल मिडिया आणि तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला. भाजपचे सर्वाधिक नेते दिल्लीत प्रचारात सहभागी झाले होते. प्रचार तोफा थंडावल्यानंतर छुप्या प्रचारावर राजकीय पक्ष लक्ष केंद्रीत करतील. आम आदमी पक्षाने त्यांच्या आधीच सुरू असलेल्या सर्व योजना सुरू ठेवू, असे आश्वासन दिले. सोबतच महिलांना आर्थिक सहाय्य आणि अन्यही घटकांना आकर्षित करणाऱ्या योजना जाहीर केल्या. तर भाजप आणि कॉंग्रेसने महिलांना आर्थिक सहाय्य, वीज बील सवलत, युवकांसाठी योजना, आरोग्य विमा योजना अशा योजना जाहीर केल्या. तिन्ही पक्षांनी दिल्लीतील सर्व घटकांना आकर्षित करतील, अशा योजना टप्प्याटप्प्याने जाहीर केल्या.

## ठेवीदारांनी आजचा आक्रोश मोर्चा ऐतिहासिक करावा–प्रा.सचिन उबाळे

### जनआक्रोश मोर्चा सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार

बीड। प्रतिनिधी

**ज्ञानराधासह दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांच्या ठेवीदरांचा आज मंगळवारी (दि.४) बीडमध्ये जनआक्रोश मोर्चा निघणार असून हा मोर्चा ठेवीदारांनी ऐतिहासिक करावा असे आवाहन ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी केले आहे.**



जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. या ठेवी परत मिळाव्यात, अर्जना कुटे यांच्यासह फरार असलेल्या अध्यक्ष व संचालक मडळांना अटक करावी, मल्टिस्टेट, पतसंस्थांच्यातपासाची माहिती ठेवीदारांना द्यावी, दीड वर्षांचा कालावधी लोटला तरी या प्रकरणी समाधनकारक तपास लागेला नाही. यामुळे यासह या प्रकरणी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज मंगळवारी (दि.४) सकाळी ११ वाजता ठेवीदारांच्या जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पाहार घालून मोर्चाला सुरुवात होईल. यानंतर माळीवेस, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे. मोर्चातठेवीदारांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोर्चा ऐतिहासिक करावा असे आवाहन प्रा.सचिन उबाळे यांनी केले आहे.

## पत्रकारांचे प्रश्न समजून घेण्यासाठी संवाद रॅली–एस एम देशमुख

### बीड शहरात पुणे–सेलू रॅली चे भव्य स्वागत

बीड। प्रतिनिधी

**सेलू येथील पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे ते सेलू काढण्यात आलेली रॅली हे तालुका स्तरावरील पत्रकारांचे प्रश्न समजून घेण्यासाठीच आहे. त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्याची सोडवणूक करणे हाच या रॅलीचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख यांनी बीड येथील स्वागत समारंभात बोलताना केले.**

यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी, पुणे जिल्हा अध्यक्ष लोणकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे, पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष अनिल वडघुले, ज्येष्ठ पत्रकार एम.जी. शेलार यांच्यासह पुण्यातील पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख कार्यक्रम प्रसंगी बीड येथील सर्व व सर्व पत्रकार बांधवांचे विशेष आभार व्यक्त केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रातील सर्वच पत्रकारांच्या अनेक समस्या आहेत, त्यात पत्रकार पेन्शन हा मोठा विषय आहे. तुरळक सोडता सर्वच ज्येष्ठ पत्रकार पेन्शन पासून वंचित आहेत. आपण या सर्व पत्रकारांच्या अडचणीसाठी संघर्ष करणार आहोत आणि सर्वांना न्याय देऊ असे देखील एस.एम. देशमुख म्हणाले. शासकीय विश्रामगृहावर पुण्याहून आलेल्या या रॅलीचे सायंकाळी ६ वाजता भव्य स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभाला बीड तालुका आणि जिल्हा पदाधिकाऱ्यांनी तसेच बीड तालुका सदस्य आणि मान्यवर संपादक उपस्थित होते. या सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आणि




सूत्रसंचालन बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले तर विभागीय समन्वयक सुभाष चौरे यांनी आभार मानले. यावेळी संपादक सर्वोत्तम गावरस्कर, संपादक राजेंद्र आगवान, संपादक राजेंद्र होळकर, संपादक सुनील क्षीरसागर, संपादक अभिमन्यू घरत, लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी सोमनाथ खताळ, दैनिक पुढारी चे उपसंपादक उदय नागरगोजे, राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक अशोक खाडे, अनिल जाधव, पत्रकार दत्ता आजबे, रेहान शेख, ज्येष्ठ पत्रकार नारायण नागरे, डॉ. संजय तांदळे, प्रशांत लहुरीकर, प्रचंड सोळंके, वाव्हळ आदींची उपस्थिती होती.

# कोट्यावधींच्या कांदा घोटाळ्यात कारवाईचा फास आवळला

## राज्यातील १५ कंपन्यांवर केंद्राकडून थेट कारवाई

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील १५ कांदा उत्पादक कंपन्यांवर केंद्र सरकारने कारवाई केली आहे. केंद्रीय ग्राहक संरक्षण मंत्रालयाकडून एनसीसीएफशी संबंधित १५ शेतकरी उत्पादक कंपन्यांना काळ्या यादीत टाकले आहे. याचबरोबर त्यांच्यासोबत होणारे सर्व व्यवहार तातडीने थांबवण्यात आले आहेत. एनसीसीएफचे महासंचालक अनीस जोसेफ चंद्रा यांनी या बद्दल आदेश काढले आहेत. तसेच पुण्यातीलही एका एफपीओवर गुन्हा नोंदवला आहे.**

मागच्या काही काळापासून नाशिकमधील शेतकरी नेत्यांनी कांदा खरेदीत घोटाळा होत असल्याचे पुराव्यासह उघड केले होते. परंतु संबंधित कंपन्यांवर कारवाई होत नव्हती. मात्र, भ्रष्ट अधिकारी आणि कंपन्यांना पुराव्यासह पकडण्यात आल्याने थेट कारवाई करण्यात आली आहे. मागील काळात झालेल्या निवडणुकांमध्ये भाजपला निवडणुकांत राजकीय फटका बसला. त्यामुळे केंद्र सरकारने या प्रकरणाची गंभीर दाखल घेऊन अखेरीस कांदा घोटाळा करणाऱ्या कंपन्यांवर काळ्या यादीत टाकण्याची कारवाई केली असल्याचे बोलले जात आहे.



### या कंपन्यांचा समावेश

१) गौतमी गोदावरी फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, २) पान्झाराक्कन फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, ३) जनाई डेअरी शेतकरी प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, ४) गोदावरी फार्म्स असोसिंएट प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, ५) महा एफपीओ फेडरेशन, ६) गंगा मध्यमेश्वर फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, ७) गुरुसिद्धी फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड. ८) दि लोकराजे शाहू महाराज मल्टीस्टेट ॲग्रो को ऑप. सोसायटी लिमिटेड, ९) स्वप्नशिवार ॲग्री फार्म प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, १०) श्री स्वामिनी फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, ११) कणलाड ॲर्गो फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, १२) अग्रिवेश ॲर्गो फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, १३) सेवेन क्रिस्टल ॲग्रो फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, १४) मल्मथ शेतकरी विकास प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड, १५) जय ॲग्रो फार्मर्स प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड. या कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

cmyk

# राज्यात जलसंधारणाच्या कामाला गती येणार

## मुख्यमंत्र्यांना मिळणार नामची साथ, बैठकीत ३ महत्त्वाचे करार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत जलसंधारणाच्या कामाला गती देण्यावर चर्चा झाली आहे. तसेच ३ महत्वाचे करार देखील झाले असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. यावेळी अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे तसेच विविध विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते.

३ महत्वाचे करार कोणते? : १) टाटा मोटर्स, नाम फाऊंडेशन आणि मृद व जलसंधारण विभाग टाटा मोटर्स, नाम फाऊंडेशन आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यात जलसंधारणाच्या कामालासंदर्भात एक महत्वाचा करार करण्यात आला आहे. यामाध्यमातून २३ जिल्ह्यात १००० जलाशय तयार करण्यात येणार आहेत. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या उपस्थित हा करार करण्यात आला आहे.

२) भारतीय जैन संघटना आणि मृद व जलसंधारण विभाग भारतीय जैन संघटना आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यात देखील



जलसंधारणाच्या कामासंदर्भात एक करार झाला आहे. जलसंधारणासाठी मनुष्यबळ पुरवण्यात येणार आहे. ३) आणि मृद व जलसंधारण विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग यांच्यातही करार झाला आहे. यामध्ये जलसाठे तयार करण्यासाठी तंत्रज्ञान पुरवण्यात येणार आहे. गावागावात जाऊन काम करायचंय : नाना पाटेकर नाम फाउंडेशनचं जलसंधारणचं काम आहे त्याची बैठक होती. सामुदायिकरित्या जलयात्रा करायची असल्याचे अभिनेते नाना पाटेकर म्हणाले. गावागावात जाऊन काम करायचं आहे. प्रत्येक गावात जाऊन काम करायचं आहे. लोक सहभाग होतायत त्यासंदर्भात बैठक होती. मागच्या वेळी काम सुरु केलं तेव्हा फडणवीस होते मध्यंतरी शिंदे होते आताही फडणवीस आहेत असे नाना पाटेकर म्हणाले. त्यामुळं कामाला कोणतीही समस्या नसल्याचे पाटेकर म्हणाले. नाम संस्थेनं ९ वर्षात १ हजारपेक्षा अधिक गावात काम केलं : मकरंद अनासपुरे : एका करारासंदर्भात सरकारसोबत बैठक होती, अशी माहिती अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी बैठकीपूर्वी दिली होती. नाम ही संस्था आमची नाही सर्वांची आहे. ही संस्था १० वर्ष पूर्ण करत आहे. त्याचा आनंद असल्याचे अनासपुरे म्हणाले. ९ वर्षात १ हजारपेक्षा अधिक गावात आम्ही काम केलं आहे. आता यां वर्षात अधिक गावात काम करु असेही अनासपुरे म्हणाले. यावेळेस २३ जिल्ह्यात काम करणार आहोत, लोकांनी सहभागी व्हावं असं आम्ही त्यांनी आवाहन करत असल्याचे अनासपुरे म्हणाले. लोकांनी लोकांसाठी सुरु केलेली ही चळवळ आहे. सरकार चांगली मदत करत आहे. त्यामुळं पुढेही चांगलं काम होईल अशी आशा असल्याचे अनासपुरे म्हणाले.

# बटाट्याची ही जात देते बंपर उत्पादन, सरकारनेही दिली आहे मान्यता



बटाटा ही बारमाही भाज्यांपैकी एक आहे. त्याची मागणी बाजारात नेहमीच असते. यामुळे बटाट्याची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नेहमीच नफा मिळतो. बटाट्याच्या अशा विविध जातींबद्दल माहिती घेऊन त्याची लागवड केल्यास शेतकरी भरघोस नफा कमवू शकतात.

बटाटा हे प्रमुख नगदी पीक आहे. यामध्ये स्टार्च, प्रोटीन, व्हिटॅमिन-सी आणि खनिज क्षार मुबलक प्रमाणात आढळतात. जास्त उत्पादन देणाऱ्या वाणांची वेळेवर पेरणी, खतांचा संतुलित प्रमाणात वापर, योग्य कीटकनाशके आणि बटाट्याचे अधिक उत्पादन घेऊन योग्य पाणी व्यवस्थापन करून शेतकरी उत्पादन आणि उत्पन्न दोन्ही वाढवू शकतात.

बटाटा लागवडीत या जातीला प्राधान्य द्या : आयसीएआरच्या मते, जर तुम्हाला व्यवसायाच्या दृष्टिकोनातून बटाट्याची शेती करायची असेल, तर तुम्ही 'कुफरी पुखराज' जातीला प्राधान्य द्यावे. ही जात उत्तर भारतात खूप लोकप्रिय आहे. हीच जात कमी काळात उच्च उत्पन्नासाठीही ओळखली जाते. या बटाटा पिकावर रोगांचे प्रमाण कमी आहे. यावर दवामुळे हे पीक खराब होण्याची शक्यता देखील कमी आहे. हे पीक सुमारे १०० दिवसांत तयार होते. एका हेक्टरमध्ये ४०० क्विंटलपर्यंतचे पीक त्यातून तयार होते. उत्तर प्रदेश, बंगाल, बिहार, झारखंड, आसाम, पंजाब, हरियाणा, गुजरात, छत्तीसगड, ओडिशा या राज्यांतील एकूण बटाटा उत्पादनात कुफरी पुष्कराजचा वाटा ८० टक्के आहे. देशभरातील बटाट्याच्या एकूण उत्पादनात त्याचा वाटा ३३ टक्के आहे. २०२१-२२ या वर्षात वार्षिक आर्थिक अधिशेष ४७२९ कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे.

# सेंद्रिय कर्बाच्या वाढीसाठी कोंबडी खत उत्तम पर्याय

जमिनीचे आरोग्य वरचेवर बिघडत चालले असून, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाणे ०.५ टक्क्यांच्या खाली आले आहे. परिणामी जमिनीची उत्पादकता झपाट्याने कमी होताना दिसत आहे. शेतात कितीही खर्च करून अपेक्षीत उत्पादन मिळत नाही. त्याचे मुळ कारण जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे कमी झालेले प्रमाण हेच आहे. त्यामुळे आता जमिनीमधील सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे गरजेचे झाले आहे. किंवा त्या शिवाय पर्यायच उरलेला नाही. जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढण्यासाठी कोंबडी खत हा उत्तम पर्याय असून, इतर खताच्या तुलनेत सर्वपातळीवर कोंबडी खताची जादू मोठी आहे.

कोंबडी खत वापरल्याने मातीची भौतीक, रासायनिक व जैविक क्षमता सुधारते. कोंबडी खताचा वापर हा बागायती क्षेत्रासाठी चांगला होतो. कोंबडी खताचा विचार केला तर या खताची प्रत ही कोंबडीची जात, वापरण्यात आलेले साहित्य, कोंबडीचे खाद्य, जागा व पाण्याचा वापर यासारख्या घटकांवर अवलंबून असतो. कोंबडी खतामध्ये १३ प्रकारचे अन्नद्रव्ये असतात. त्यामध्ये नत्र व स्फुरद जास्त प्रमाणात असते. कोंबडी खतातील नत्र हे अमोनिया, नायट्रेट, यूरिक ॲसिड या प्रमाणात आढळते. शिवाय कोंबडी खतामधून मुख्य अन्नद्रव्या व्यतिरिक्त कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर, सोडियम, बोरॉन, झिंक, कॉपर इत्याची अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. चांगल्या दर्जाच्या कोंबडी खताचा रंग भुरकट, काळपट असतो. तर सामू साडेसहा ते साडे सात दरम्यान असतो. कणांचा आकार पाच ते दहा मी.मी असतो. दर्जेदार कोंबडी खतामधील कर्ब नत्र गुणोत्तर प्रमाण १:१० ते १:२० दरम्यान असते. तर जलधारणशक्ती टक्क्यापेक्षा जास्त असते. असे गुणधर्म असलेले कोंबडी खत मातीचा कर्ब वाढवण्यासाठी सर्वोत्तम असते. अशा पद्धतीने करा वापर : कोंबडी खत मुळातच उष्ण असते. त्यामुळे ते पेरणीपूर्वी एक ते दीड महिना अगोदर मशागतीच्या वेळी शेतात टाकून जमिनीत मिसळून घ्यावे. त्यानंतर कुळवाची पाळी द्यावी. ताजे कोंबडी खत उभ्या पिकांना कधीही देवू नये, किंवा जमिनीत मिसळू नये. जर उभ्या पिकाला कोंबडी खत द्यायचे असेल तर ते एक महिना अगोदर पाणी शिंपडून थंड होऊ द्यावे. त्यानंतरच ते उभ्या पिकात किंवा जमिनीला द्यावे. असे केल्यामुळे त्याचे कर्म नत्र गुणोत्तर स्थिर होते. त्यातील अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होतात. उभ्या पिकात कोंबडी खत देताना जमिनीत पुरेसा ओलावा असावा. ओलावा नसल्यास पीक पिवळे पडण्याची शक्यता असते. जमीन व पीक लागवडी नुसार प्रती एकरी पाच ते २० टन कोंबडी खताचा वापर करावा.



# फळबाग लागवडीसाठी जमीन अन पुर्वतयारी

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे, आपल्या जमिनीत फळझाडे येतील का, बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का, आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील, मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय, बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकती, जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय, प्रक्रिया उद्योग आहेत काय, अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. एकदा त्यात पडले की थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सातत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो, पाणी पुरत नाही. भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही. सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो. त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते. त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता असते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे माहिती नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत, मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १०



टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

फळबागेची आखणी आणि अंतर : फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे, तेंव्हा जमिनीची आखणी करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार (कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी, आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य अशी पद्धत प्रामुख्याने सर्वत्र वापरली जाते, आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडातील आणि दोन रोपातील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

फळबाग लागवडीचे अंतर : विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे ? जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे,तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत.जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा. खड्डे खोदण्याचे काम उशिरात उशिरा एप्रिल महिन्यात पूर्ण करावे.सर्व साधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठया विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ बाय १ बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकारच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ से. मी. व लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० से.मी आकारचे खड्डे घ्यावेत. जमीन डोंगर उतारची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी.

फळबागेसाठी खड्डा कसा भराल? : खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे तीन आठवडे तापू द्यावे जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडूळखत + २ ते ३ किलो लिंबोळी पेंड २५ ग्रॅम टायकोडर्मा जीवाणू +१५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू +२५ ग्रॅम ॲझोटोबॅकटर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ से.मी उंच भरून ठेवावा.म्हणजे पावसाळ्याच्यासुरुवाती बरोबर लागवड करता येईल.

फळबाग लागवडीची योग्य वेळ : खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी. अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली समाधानकारक वाढतात. काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात. जून-जुलै पर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते. फळझाडांच्या लागवडीसाठी योग्य आकाराचा खड्डा, योग्य अंतरावर एप्रिल-मे महिन्यातच खोदावेत. उन्हाळ्यात खड्डे तापू द्यावेत. खड्डा भरताना तळाला पालापाचोळा टाकून १५ ते २० किलो चांगले कुजलेले शेणखत व पोयटा माती व १ ते १.५ किलो सिंगल सुपर फॉसपेट व ५०-१०० ग्रॅम फॉलीडॉल पावडर यांच्या मिश्रणाने मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यात अथवा जून च्या पहिल्या आठवड्यात भरून घ्यावा. दोन चांगले पाऊस पडून गेल्यावर सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात रोपांची/कलमांची लागवड करावी. रोपे/कलमे खात्रीशीर रोपवाटिकेतूनच खरेदी करावीत.




### महत्वाच्या घटना

१२९४ : अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरी किल्ला सर केला आणि देवगिरीच्या यादव साम्राज्याचा अस्त झाला.
१६७० : सिंहगड ताब्यात मिळवण्यासाठी नरवीर तानाजी मालुसरे यांनी प्राणाची आहुती दिली.
१७६६ : माधवराव पेशवे आणि हैदराबदचा निजाम यांची कुरुमखेड येथे भेट
१९१९ : चार्ली चॅप्लिनने इतर तीन जणांबरोबर युनायटेड आर्टिस्ट्स कंपनीची स्थापना केली.
१९२२ : रीडर्स डायजेस्टचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध जनरल डग्लस मॅकआर्थर मनिला येथे परतले.
१९४८ : गांधी हत्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सुरक्षा-निर्बंधान्वये अटक झाली.
१९५२ : स्वतंत्र भारतात प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या.
१९५३ : आजच्या दिवशी वॉल्ट डिज़्नी यांची पीटर पॅन मूवीचा प्रीमियर ची सुरुवात झाली.
१९५८ : ७,६०० पौंडाचा एक हायड्रोजन बॉम्ब अमेरिकेच्या वायुसेनेने टायबी बेटांजवळ हरवला. हा बॉम्ब अमेरिकेने कायमचे हरवलेल्या चार आण्विक हत्यारांपैकी एक आहे.
१९६१ : आजच्या दिवशी संडे ''टेलिग्राफ न्यूज'' चा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९६२ : फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स डी गॉल यांनी अल्जेरियाला स्वातंत्र्य द्यावे असे आवाहन केले.
१९७१ : आजच्या दिवशी अपोलो-१४ अंतरीक्ष यान चंद्रावर उतरून अंतराळवीर सुद्धा चंद्रावर उतरले.
१९९९ : नेल्सन मंडेला यांनी संसद मध्ये त्यांचे शेवटचे भाषण दिले आणि मे महिन्यात त्यांनी पदाचा त्याग केला.
२००३ : भारताने २००२ मध्ये सोडलेल्या पीएसएलव्ही सी-४ या हवामानविषयक उपग्रहाला अंतराळवीर कल्पना चावला यांचे नाव देण्यात आल्याची पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची घोषणा.
२००४ : 'पुण्याची' स्वाती घाटे बुद्धिबळातील वूमन ग्रँडमास्टर झाली.
२००७ : सुनिता विल्यम्स हि अंतराळात जास्त वेळ राहणारी पहिली भारतीय महिला बनली.
२०१० : आजच्या दिवशी अभिनव बिंद्रा ने नेदरलँड्स आंतरराष्ट्रीय शुटींग चॅम्पियनशिप मध्ये ६०० पैकी ५९६ अंक मिळवून सुवर्ण पदक स्वतःच्या नावावर केले.
२०१६ : ला आजच्या दिवशी वित्त मंत्रालयाने युटूब चॅनेल सुरु केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८८ : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान रॉबर्ट पील यांचा जन्म.
१८४० : जॉन बॉईड डनलॉप वाहनांच्या रबरी धावांच्या आत हवा भरलेली नळी वापरण्याच्या तंत्राचा शोध लावणारे स्कॉटिश संशोधक (मृत्यू: २३ आक्टोबर १९२१)
१९०५ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (मृत्यू: ५ ऑगस्ट १९९२)
१९१४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (मृत्यू: ३० ऑगस्ट १९९४)
१९१६ : भारतीय कवी जानकी वल्लभ शास्त्री यांचा जन्म.
१९१९ : देशाचे पहिले मुस्लीम विदेश मंत्री खुर्शीद आलम खान यांचा जन्म.
१९३३ : गिरीजा कीर लेखिका आणि कथाकथनकार
१९३६ : बाबा महाराज सातारकर कीर्तनकार
१९४९ : महाराष्ट्राच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण यांचा जन्म.
१९७६ : अभिषेक बच्चन अभिनेता
१९९० : ला भारतीय गोलंदाज भुवनेश्वर कुमार चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२० : आळंदी येथील वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक विष्णू नरसिंह जोग यांनी समाधि घेतली. (जन्म: १४ सप्टेंबर १८६७)
१९२७ : हजरत इनायत खाँ हिन्दुस्थानी शास्त्रीय गायक (जन्म: ५ जुलै १८८२)
१९९९ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध नर्तकी इंद्राणी रहमान यांचे निधन.
२००० : कालिंदी केसकर गायिका
२००३ : गणेश गद्रे ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व महात्मा गांधींच्या 'हरिजन' या मराठी अंकाचे संपादक
२००८ : महर्षी महेश योगी योग गुरू (जन्म: १२ जानेवारी १९१७)
२०१० : सुजित कुमार चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: ७ फेब्रुवारी १९३४)

# शासकीय हरभरा खरेदीची शेतकऱ्यांकडून प्रतिक्षा

संभाजीनगर : खानदेशात शासकीय हरभरा खरेदीचा मुहूर्त यंदा लवकर होईल, असे नियोजन सुरू असल्याची माहिती आहे. यंदा खरेदी मे महिन्यात सुरू होईल, असे संकेत आहेत. मागील वर्षी हरभरा खरेदी जूनमध्ये सुरू झाली होती.

हरभरा, बाजरी, मका आदींची खरेदी एकाच वेळी सुरू होईल, असे संकेत आहेत. परंतु अद्याप या खरेदीसाठी नोंदणी किंवा अन्य कार्यवाही सुरू झालेली नाही. ही कार्यवाही लवकर सुरू करण्याचा मुद्दाही उपस्थित केला जात आहे. पुढील महिन्यात हरभरा मळणी सुरू होईल. मळणीनंतर आवक वाढते व दर कमी होता. यामुळे हमीभावात हरभरा विक्री करण्यासाठी शेतकरी नियोजन करीत असून, त्यासंबंधी लवकर खरेदी सुरू करण्याची मागणी होत आहे. बाजारात हरभऱ्याचे दर मागील वेळेस काही दिवस हमीभावाच्या जवळपास होते. परंतु सध्या दरांबाबत कुठलाही अंदाज नाही. मागील वेळेस देशी प्रकारच्या हरभऱ्याला ४५०० ते ४६०० रुपये प्रतिक्विंटल एवढे होते. यंदाही अशीच स्थिती राहू शकते. यामुळे शासकीय केंद्रात हरभरा विक्रीसंबंधी नोंदणीची प्रक्रिया सुरू होईल, अशी अपेक्षा आणि प्रतीक्षा शेतकरी करीत आहेत.

# रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी केंद्रीय रेल्वेमंत्री, रेल्वे सुरक्षा आयुक्त यांना तक्रार

## रेल्वे आयुक्तांच्या दौऱ्यात रेल्वे पुलावरच आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड। प्रतिनिधी

अहिल्यानगर -बीड- रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन मध्यंतरी पाडण्याचे काम सुरू होते. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून जनतेच्या पैशाचा अपव्यय करणा-या संबंधित रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक)रामधन जमाले,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे यांनी निवासी जिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना लेखी निवेदन देऊन दि.०५ बुधवार रोजी रेल्वे पुलावरच धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.





अहिल्यानगर - बीड -परळी रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने पाडण्यात येत होता.आम्ही दि.२३.१२.२०२४ रोजी प्रशासनाला लेखी तक्रार केल्यानंतर आणि विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर पुल पाडण्याचे काम थांबविण्यात आले.यापुलासाठी जनतेच्या पैशाचा अपव्यय झाला असुन संबंधित प्रकरणात जबाबदार रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्गावरील पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांची सखोल चौकशी करून नुकसान भरपाई वसूल करून शासन दरबारी जमा करण्यात यावी.तसेच याठिकाणी लोहमार्ग ओलांडताना ग्रामस्थांचे हाल होत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी तसेच बीड तालुक्यातील नवगण राजुरी, बाभुळखुंटा आदी गावातील रेल्वे पुलांच्या खाली पावसाळ्यात गुडघाभर पाणी साचून नागरीकांना त्रास होतो त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

दि.०५.०२.२०२५ वार बुधवार रोजी राजुरी ते बीड या नविन रेल्वे लोहमार्गाची जलदगती चाचणी घेण्यात येणार आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा रेल्वे प्रवाशांची सुरक्षा व सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना या दृष्टीने राजुरी ते बीड रेल्वे स्थानका दरम्यानची तपासणी करणार असुन त्याच दिवशी दि.५ बुधवार रोजी च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील रेल्वे पुलावर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन रेल्वे सुरक्षा आयुक्त यांना जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत देण्यात आले आहे.

## थोडक्यात



### रासेयो शिबिरात बालविवाह प्रतिबंध मार्गदर्शन व्याख्यान

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे चुंबळी येथे सुरु असलेल्या विशेष युवक शिबिरात ३१ जानेवारी रोजी लिंगभाव व बालविवाह या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे होते. प्रमुख वक्ते म्हणून शिरूर(का) येथील ग्रामीण विकास केंद्राचे अध्यक्ष श्री. समीर पठाण उपस्थित होते. व्यासपीठावर सह कार्यक्रमाधिकारी प्रा. मनिषा गाढवे उपस्थित होत्या.

आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात समीर पठाण यांनी लिंगभाव हा समाजाच्या मानसिकतेला लागलेला कलंक आहे व त्यासाठी जनजागृती आवश्यक आहे तसेच बालविवाह हा अल्पवयीन मुलीचा तारुण्यात येण्याआधीच मृत्यू आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. सोमनाथ सोमनाथ लांडगे यांनी लिंगभेद आणि बालविवाह या दोन्हीही समस्या समाजाला लागलेली एक कीड असून प्रत्येक युवकाने याविरुद्ध समाजात जनजागृती करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. व्याख्यानानंतर वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी बालविवाह प्रतिबंधक पथनाट्य सादर केले ज्यामधून अल्पवयीन मुलीचा बालविवाह करून दिल्याने तिला भोगावे लागणारे शारीरिक दुष्परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सय्यद शानूर यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. कृष्णा नागरे यांनी केले. त्यानंतर मौजे चुंबळी गावांमधून विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर फेरी काढून बालविवाह प्रतिबंधक घोषणा देऊन जनजागृती केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. प्रदीप मांजरे, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. दिनेश राऊत, डॉ. चंद्रशेखर बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात जलव्यवस्थापनावर व्याख्यान

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे चुंबळी येथे सुरु असलेल्या विशेष युवक शिबिरात ३० जानेवारी रोजी जलव्यवस्थापन व जलसंवर्धन विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रमेश लांडगे उपस्थित होते. व्यासपीठावर सह कार्यक्रमाधिकारी प्रा. मनिषा गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना डॉ. रमेश लांडगे यांनी जलव्यवस्थापन व जलसंवर्धन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जलसंवर्धन करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी असून कुशलपणे जलव्यवस्थापन करणे हे त्याचे आद्य कर्तव्य असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. त्याचबरोबर प्रचंड प्रमाणात होत असणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्जन्यमान कमी झाले असून पृथ्वीवरील तापमानात वाढ झाल्याचेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. सोमनाथ लांडगे यांनी रासेयो स्वयंसेवकांना जलव्यवस्थापन व जलसंवर्धन याविषयी ग्रामीण परिसरातील आपापल्या गावात प्रत्येक घरोघरी जाऊन त्याचे महत्त्व सांगण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सय्यद शानूर यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. चंद्रशेखर बनसोडे यांनी केले. व्याख्यान कार्यक्रमास रासेयो स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.



## प्रतीक्षा मेश्राम यांना गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श अधीक्षिका पुरस्कार प्रदान

आष्टी । प्रतिनिधी

भिमराव धोंडे यांच्या १९ व्या गंगाई बाबाजी महोत्सवाचे आयोजन भगवान महाविद्यालय आष्टी या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांची निवड करून त्यांना पुरस्काराने सन्मानित केले जाते.



शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी ता.आष्टी येथील स्त्री अधिक्षिका प्रतीक्षा राजेंद्र मेश्राम यांना शासनाने नेमून दिले काम अतिशय व्यवस्थितपणे पार पाडले, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांची सेवा करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करणे, सर्व विद्यार्थ्यांची काळजी घेऊन त्यांना समाजाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी मदत करणे, तसेच शासनाच्या योजना खावटी किटचे वाटप, जात प्रमाणपत्रासाठी सर्वे करणे, विविध क्षेत्रात, क्रीडाक्षेत्र, कलाक्षेत्र मध्ये अशा शासकीय योजनांमध्ये सहभाग घेऊन कामे पूर्ण करणे, अशा सेवेबद्दल गंगाई बाबाजी प्रतिष्ठान महोत्सवामध्ये प्रसिद्ध सिनेअभिनेत्री कल्याणी चौधरी, माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श स्त्री अधिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथील चेतना मोरे,प्रकल्प अधिकारी, भगवान गायकवाड सप्रअ, विनोदकुमार सांगळे,सप्रअ तथा पालक अधिकारी सुरुडी, डॉ. उद्धव वायाळ, सप्रअ, प्रवीण भालेराव, लेखाअधिकारी, दामोदर भानुसे, सलेआ, भागवत कदम, सप्रअ, गजानन रत्नपारखे कार्यालयीन अधीक्षक, कारभारी भोरपे, कार्यालयीन अधीक्षक, उल्हास चव्हाण, पुरुषोत्तम कायंदे, चेतन सोनवणे, आदिवासी निरीक्षक, साधना अंभोरे, शिक्षण विस्ताराधिकारी, तसेच शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सुरुडी चे मुख्याध्यापक सुधाकर राठोड व नीता मुंडे, संभाजी मुसळे, शिवाजी गांधले, संतोष मेहत्रे, विशाल दोरगे,कविता पानसरे, नवनाथ रेवनकर, सुरज शिंदे, प्रवीण पुंड, केतन काकडे, संगीता जाधव, अमित पवार, निलेश आहेर, वैजनाथ आतकरे, प्रियंका नवले, प्रशांत सरोदे, शाहूराव सानप, मदन सावंत, किसन शिंदे, मोहन जाधव, विलास जाधव, चांगदेव पवार, वेणूबाई केसकर, मच्छिंद्र शिरसाट, बाबू हजारे, रेणूताई हजारे, खरात मावशी, आदींनी अभिनंदन केले.

## वडवणी येथे संत तुकाराम महाराज जयंती



वडवणी। प्रतिनिधी

पाचवा वेद निर्माते, वारकरी संप्रदायाचे कळस म्हणजे तुकाराम महाराज यांची जयंती काल दि. ०२/०२/२०२५ रविवारी मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज जयंती आणि विठ्ठल रुक्मिणी विवाहाचे औचित्य साधून ह. भ. प. हरिदास महाराज सोळंके गुरूजी मोहखेडकर यांच्या निवासस्थानी वडवणी येथे संगीत भजन संध्याचे आयोजन करण्यात आले होते.या भजन संध्येसाठी हार्मोनियम साथ ह. भ प. श्री दगडू महाराज पारगावकर यांनी केली. मृदंग साथ ह. भ. प. ओम महाराज कदम यांनी केली. गायनसाथी साठी ह. भ. प. सुधाकर महाराज पाऊले, विठ्ठलराव अंडील पारगावकर, प्रा. गोपीचंद घायतिडक सर, प्रदीप मस्के हे उपस्थित होते. यावेळी या भजन संध्या कार्यक्रमात ताल सूर लय आणि भजनी ठेक्यायमधे सुरेल अभंग गायीले.या बरोबरच भयरवी गायनाने संपूर्ण परिसर हा भक्तीमय झाला होता. विविध गोड भजनी चालीत एक से बडकर एक संप्रदयीक चाली व गवळणी गायनाने तुकाराम महाराज जयती कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात संपंन झाला. या सर्व उपस्थित परमार्थप्रेमी वैष्णवांचा सोळंके परिवारातर्फे शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

## स्नेहा दुधाळ हिला राज्यस्तरीय खुल्या लावणीनृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक

बीड। प्रतिनिधी

केएसके काकू कृषी महाविद्यालयाची प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. स्नेहा दुधाळ हिने गंगाई- बाबाजी महोत्सव २०२५ खुल्या राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकवले.कु. स्नेहा हिने लाही लाही होते अंगाची या गीतावर बहारदार लावणी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली आणि छाप पाडत भगवान विद्यालय, आष्टी जि. बीड आयोजित आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय खुल्या लावणीनृत्य स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकवले. यामध्ये तिला सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ९००१/- रु. रोख रक्कम प्रदान करण्यात आली.



बक्षीस वितरण गंगाई - बाबाजी महोत्सव २०२५ चे अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, प्रमुख अतिथी श्री. राम शिंदे, सभापती - विधान परिषद, महाराष्ट्र राज्य, सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री - कल्याणी चौधरी आणि श्री. अजय भीमराव धोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्नेहाला या स्पर्धेत यश मिळवण्याकरिता महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्रविण मांजरे आणि जिमखाना उपाध्यक्ष प्रा. सचिन राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आवडत्या क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी तसेच यश मिळवण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना विविध क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी महाविद्यालय प्रशासन तत्पर असते. राज्यस्तरीय स्पर्धेत बक्षीस पटकाविल्याबद्दल संस्थेचे सचिव मा. श्री. जयदत्त क्षीरसागर, सहसचिव डॉ. गोविंद साळुंके तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, सांस्कृतिक विभाग, जिमखाना विभाग आणि प्राध्यापक कर्मचारी यांनी अभिनंदन केले. कु. स्नेहाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सत्संगतीने सन्मार्गावर आढळ राहिल्याने सर्वोच्च ध्येय साध्य होते-मातकर

बीड। प्रतिनिधी

मनुष्य जन्म सर्वोच्च ध्येय प्राप्तीसाठी असून सत्संगतीने सन्मार्गावर आढळ राहिल्याने कोणतेही कठीण असे ध्येय साध्य होते असे परातीपदन ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले. ते वाढवाणा ता.बीड येथील अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तन सेवेत बोलत होते. बंकटस्वामी संस्थानचे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथे गेल्या ३७ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.



जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या, 'म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवाशी या अभंगावर अतिशय विस्तृत चिंतन केले. अनेक जन्मानंतर अनमोल मनुष्य देह आपणास प्राप्त झाला आहे. याच देहाने कोणतेही सामाजिक, सांसारिक, परमार्थिक सर्वोच्च ध्येय आपणास प्राप्त करता येते. जन्म,मृत्यू ,जरा ,व्याधी यासारखे दुःख कायमस्वरूपी नाहीसे करण्यासाठी मनुष्यजन्म हे साधन प्राप्त झाले आहे.

हे दुःख भगवंतास शरण गेल्यानेच नाहीसे होऊ शकते. आपण सर्व भावांनी युक्त भगवंत शरणांगती पत्करल्यास तो कठीण अशा भवसागरातून आपणास पैल तीराला घेऊन जातो. अनंत नावाने विभूषित असलेला भगवंत अतिशय करुणावंत आहे. व्यसनांपासून दूर राहून आपण सन्मार्गावर आढळ राहिल्यास आपले जीवन सुखी होते. असे चिंतन त्यांनी केले. यावेळी कीर्तन साथसंगतीसाठी गायक बंडू महाराज जटाळ, बिबीशन महाराज कोकाटे ,हरिभाऊ महाराज काळे , सुंदर महाराज खैरे,संजय महाराज काशिद, घोलप महाराज यांच्यासह गावातील भजनी मंडळ तसेच श्री संत भीम सिंह महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी व मृदंग साथीसाठी आप्पासाहेब महाराज कोटुळे यांची साथ होती. कीर्तनासाठी समस्त वाढवाणा गावकरी मंडळी, महिला, तरुण मंडळी व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
### मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १९१/२०२५**
**(मार्फत ॲड. ए.एन. बारगजे बीड)**
**प्रयागाबाई व इतर - वि. निरंक**

ज्याअर्थी मयत नामे दिनकरराव रंगनाथराव कराड रा. शिवाजीनगर बीड हे दि. १३.०७. २०२१ रोजी मौजे शिवाजीनगर बीड येथे मयत झाले आहेत.
अर्जदार : १) प्रयागाबाई दिनकर कराड रा. नवगण कॉलेज समोर बीड
२) विजयकुमार दिनकर कराड रा. नवगण कॉलेज समोर बीड
३) संध्या नितीन सांगळे रा. वाघोली पुणे
४) माधवी विकास बडे रा. VTC खारगर जि. रायगड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे दिनकरराव रंगनाथराव कराड रा. शिवाजीनगर बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज / / २०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पढील तारीख : १७.०३.२०२५

स्वाक्षरित
**क.लिपिक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.


# खा.सोनवणेंनी काढले रेल्वे मार्गातील प्रलंबित 'गतिरोधक' अन् रेल्वेने धरली स्पीड

## ४ व ५ फेब्रुवारीला बीड पर्यंत जलदगती चाचणी

बीड। प्रतिनिधी

सन १९९५ ला अहिल्यानंतर-परळी रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली. काम सुरु झाले मात्र त्या कामासाठी म्हणावा तसा पाठपुरावा न झाल्याने काम रखडत गेले. २८/२९ वर्षात रेल्वेचे काम अंमळनेर पर्यंतच येऊन थांबले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिलीच बैठक रेल्वे विभागाची घेतली. कामास गती देण्यासाठी येत असलेल्या अडथळ्यांची माहिती घेतली. कामास गती देण्यासाठी रेल्वेमंत्री व रेल बोर्डाचे चेअरमन यांची वारंवार भेट घेऊन रेल्वे कामाला गती देण्याचे काम केले. पालवन परिसरात जमीनीच्या मावेजाची थकित राहिलेली प्रकरणे मार्गी लावत रेल्वे कामाला गती दिली. आता दि.४ व ५ फेब्रुवारी रोजी नवगण राजुरी ते बीड लोहमार्गावर जलदगती रेल्वेची चाचणी होत आहे.

बीडला रेल्वे आलीच पाहिजे, ही घोषणा बीडकर कायम देत. त्यासाठी केवळ घोषणा दिल्या नाही तर रस्त्यावर लढा दिला. वेळप्रसंगी पोलीसांच्या काठ्या खाल्ल्या आणि जेलही भोगले. याच संघर्षातून सन १९९५ मध्ये अहिल्यानगर ते परळी रेल्वे मार्गाला मंजूरी मिळाली. पुढे अनेक वर्षे बीड रेल्वे केवळ मंजूरीच्या स्थितीत होती. मागील काही वर्षात चार दोन वर्षात पाच दहा किलोमिटरने रेल्वेचे काम पुढे सरकत होते. मागील कालावधीत ही रेल्वे अंमळनेर पर्यंत येऊन थांबली होती. रेल्वे मार्गातील भुसंपादन आणि मावेजाचे अनेक विषय प्रलंबित होते.लोकसभा निवडणूकी मधे खा.बजरंग सोनवणे यांनी विजयी झाल्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेत, रेल्वे ही बीडकरांचे स्वप्न आहे ते पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस यंत्रणा राबविण्याच्या सुचना दिला. केवळ सुचना देऊन न थांबता भुसंपादन आणि मावेजाचे प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अवध्या सहा ते सात महिन्यात आता अंमळनेर ते बीड असा रेल्वेचा प्रवास सुरू आहे. दि.३०-३१ डिसेंबर रोजी विघनवाडी ते नवगन राजुरी या नवीन लोहमार्गाची चाचणी घेण्यात आली. पहिल्या बैठकीतच दि.२६ जानेवारीपर्यंत बीडला रेल्वे येईल, असे सांगितले होते. परंतु पालवन परिसरात दोन शेतकऱ्यांचे मावेजाचे प्रकरण प्रलंबित होते. सदरील शेतकऱ्यांना मावेजा मिळून त्या जागेचा ताबा मिळावा, यासाठी खा.सोनवणे यांनी प्रयत्न केले. यानंतर आता रेल्वेमार्गातील भुसंपादनाचा गतिरोधक निघालेला असून दिलेल्या मुदतीपेक्षा दहा दिवसात रेल्वे बीडला येत आहे.

दि.४ व ५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेच्या कामातील विघनवाडी (ता.शिरुर) ते नवगण राजुरी (ता.बीड) व नवगण राजुरी ते बीड या पूर्ण झालेल्या लोहमार्गावर निरीक्षण व जलदगती चाचणी होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे, गुरे व पाळीव प्राणी रुळावर येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. परिसरातील नागरिकांनी सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे.

- खा.बजरंग सोनवणे, बीड.

# श्रीगणेश जयंतीनिमित्त पालखी सोहळा उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यात गणेशयाग, पालखी सोहळा काढण्यात आला. सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश जयंतीनिमित्त शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात गणेश भक्त, महिला, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक आणि बाल गोपाळ आकर्षक वेशभूषा करून मोठ्या उत्साहात सहभागी झाले. यावेळी श्रीगणेशयाग पालखी सोहळ्यात युवकांनी भगव्या पताका खांद्यावर घेऊन, लेझीम तर महिलांनी झांज, टाळ वाजवून फुगडीवर ठेका धरत गणेश गीतांतून नामघोष केला. सदर पालखी भगवान महावीर चौक, कोठाड गल्ली, काळा हनुमान मंदिर खडकपुरा, देवघर, सेनापती बाजी प्रभू देशपांडे चौक, सुभेदार तानाजी मालुसरे चौक, मध्यवर्ती हनुमान मंदिर, काळम पाटील गल्ली, खोलेश्वर मंदिर येथून निघून गणपती मंदिर चौभारा येथे समारोप झाला. त्यानंतर सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. विविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिरीष भावठाणकर, विजयराव उमणवार, शंकरराव भावठाणकर, सतिश राऊत, भागवतराव देवशटवार, नंदकिशोर देशमाने, भिमाशंकर राऊत, प्रभाकर देशमाने, दयानंद दगडू राऊत, माऊली सातभाई, शंभुलिंग राऊत, संगम देवशटवार, दयानंद राऊत, बालाजी कोंडेकर, अमोल राऊत, राम घोडके, अतुल राऊत, सुहास सातभाई, शिवलिंग राऊत, शंकर सातभाई, नागेश्वर राऊत, संकेत झरकर, ओमकार धोत्रे, राहुल भावठाणकर, संदीप भावठाणकर, शुभम भावठाणकर, महेश राऊत, बालाजी राऊत, गोविंद राऊत, विलास जिरे, कृष्णा घोडके, संतोष घोडके, गजानन घोडके, अनंत घोडके, अभिजीत राऊत, अनिकेत राऊत, नितीन जिरे, योगेश कातळे, रमेश देशमाने, चंद्रकांत देशमाने, उमाकांत देशमाने, संदीप देशमाने, प्रसाद देशमाने, बाळकृष्ण देशमाने, विमलनाथ कोंडेकर, वैजनाथ जाधव, गणेश जाधव, विष्णू जाधव, पप्पू सातभाई, गजानन भावठाणकर, विशाल कंठीकर आदींसह गणेश भक्त, ट्रस्टचे पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला होता.





श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून विविध उपक्रम



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने कन्हेरवाडी गावातील बाबासाहेब मणिकराव मुंडे व कै.शिवाजी व्यंकटराव हांगे यांच्या मुलींच्या विवाहकारिता प्रत्येकी १०००० रू मदत करण्यात आली. यावेली से.स.सो. व्हाईस चेअरमन मिनीनाथ दादा फड, पिंटू वाघ फड, माजी उपसरपंच विजय मुंडे, ग्रा.प.सदस्य प्रल्हाद गित्ते, मधुकर मुंडे टेलर, सुनील फड सर, महादेव मामा मुंडे, मोहन पवार,मधुकर मस्के, मौला शेख, दीपक हांगे, समाधान मुंडे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.



## हमीदखान पठाण यांना गंगाई – बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

पाटोदा । लोकमित्र

पाटोदा तालुक्यातील रहिवासी पत्रकारिता क्षेत्रात नेत्रदिपक काम कलेले पत्रकार हमीदखान पठाण यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा गंगाई – बाबाजी आदर्श पत्रकारिता पुरस्कार मा.भिमराव धोंडे आणि सिने

पान २ वर

## अंबाजोगाई बसस्थानकात आठ तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

लग्न समारंभ आटोपून गावाकडे जाण्यासाठी बसमध्ये चढणाऱ्या महिलेच्या पर्समधील तब्बल आठ तोळे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना अंबाजोगाई शहरातील बसस्थानकात रविवारी (दि.०२) सायंकाळी ७ वाजता घडली.

सोनपेठ येथील गुलाबशहा राणी गयासोद्दीन मन्यार या पतीसह परंडा येथे एका लग्न समारंभाला गेल्या होत्या. कार्यक्रम आटोपून त्या पंढरपूर-अंबाजोगाई बसने अंबाजोगाईतील नगरपालिकेच्या उद्यानासमोरील तात्पुरत्या बसस्थानकात आल्या. त्यानंतर माजलगाव गाडीत चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्सवर डल्ला मारला. या पर्समध्ये आठ तोळे सोन्याचे दागिने ठेवलेले होते. बसमध्ये बसल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तातडीने खाली उतरून परिसरात शोध घेतला, मात्र चोरटा पसार झाला होता. यानंतर त्यांनी अंबाजोगाई शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

**अंबाजोगाईत चोरीच्या घटनांमध्ये वाढ :** गेल्या काही काळात अंबाजोगाईत चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. बंद घरे फोडणे, चेन स्नॅचिंग, पर्स चोरी यांसारख्या घटनांमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. चोऱ्या नियंत्रणात येत नसल्याने पोलीस यंत्रणेवर नाराजीचा सूर उमटत आहे.

## भारतरत्न लता मंगेशकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त गाणकोकिळा स्वरलता मैफिलीचे आयोजन




अंबाजोगाई । प्रतिनिधी

गानसम्राज्ञी लता मंगेशकर हे भारतीय चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायनाच्या इतिहासातील एक सुवर्णपान. त्यांच्या स्वर्गीय स्वरांना प्रांतांची, देशांच्या सीमांची मर्यादा नाही. या स्वरांना कोंदण आहे ते केवळ उत्कटतेचे, भव्यतेचे! फक्त संगीत जगतातच नव्हे तर अखिल विश्वामध्ये आपल्या सुमधुर गायकीने अक्षरशः वेड लावणाऱ्या अशा या महान तपस्वी, तेजस्वी गायिकेच्या पुण्यस्मरणानिमित्त मराठवाड्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असणाऱ्या अंबाजोगाई शहरांमध्ये स्थानिक कलावंतांच्या आविट स्वरांनी नटलेल्या ''गान कोकिळा स्वरलता'' या मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी कलाकार कट्टा अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषद शाखा अंबाजोगाई वसुंधरा सेवा प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने गुरुवार दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ठीक सहा वाजता बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कक्ष नगरपरिषद वाचनालय अंबाजोगाई या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा व प्रमुख उपस्थिती मराठवाड्याच्या गुणी गायिका प्रति लता सौ.गीता जायभाये यांची उपस्थिती असणार आहे. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या गायकीचा मोह सर्व आबालवृद्धांनाच आहे. यावत सूर्य चंद्र तारे असेपर्यंत स्वर्गीय लतादीदींची विविध गाणी अजरामर राहणार असून सदैव ऐकली जाणार आहेत हे नक्की. अंबाजोगाई येथील सर्व गुणी स्थानिक

पान २ वर

## दिंद्रुडमध्ये भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात



आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे गेल्या ३५ वर्षांपासून चालत आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह रविवार (२ फेब्रुवारी) पासून भक्तिमय वातावरणात खोलेश्वर मंदिर प्रांगणात सुरुवात झाला आहे .

गेल्या दोन पिढ्यांपासून जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमन सोहळा दिन व विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त हा सप्ताह चालू आहे. या सप्ताहात गावातील विविध जाती धर्मातील लोक सहभागी होऊन विविध धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतात.

ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, भागवत कथा, गाथा भजन, व रात्रौ कीर्तन महोत्सव असा आठ दिवस भक्तीमय वातावरणात हा सोहळा साजरा करण्यात येतो. या किर्तन महोत्सवात महाराष्ट्रातातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी लागणार आहे यामध्ये ह भ प किशोर महाराज बुरंगे यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा संपन्न होत आहे.रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी महादेव महाराज बोराडे सोमवार रोजी मच्छिंद्र महाराज निकम, मंगळवार रोजी अर्जुन महाराज

पान २ वर

## आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील लोकनेते माजी राज्यमंत्री आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त युवा उद्योजक तात्यासाहेब जरे व ग्रामपंचायत सदस्य अमोल भैय्या डोके यांच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाला आष्टी तालुका गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारोती पठाडे, केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे, डॉ. युवराज खराडे, डॉक्टर भरत दारकुंडे, डॉ. संदीप भवर, सरपंच बबन दादा डोके, माजी सरपंच आप्पासाहेब जरे,युवा नेते अशोक (दादा) डोके, बंकट पाचबैल, प्रा. दत्तात्रय जरे, सोमनाथ जरे, विकास जरे, कडा कारखान्याचे माजी संचालक सुधाकर डोके, पत्रकार गहिनीनाथ पाचबैल,

पान २ वर

## अपघातात दोन युवक जागीच ठार



घाटनांदूर । प्रतिनिधी

घाटनांदूर तेलघना रोडवर टेम्पोच्या अपघातात अंबलटेक (ता. अंबाजोगाई) येथील दोन युवक जागीच ठार झाल्याची घटना (ता.२) रविवारी रात्री उशिरा घडली.

अंबलटेक (ता.अंबाजोगाई) येथील दोन युवक घाटनांदूरहून टेम्पो क्र. एमएच २४ एफ ९५८८ ने अंबलटेकला जात असताना घाटनांदूर ते तेलघणा दरम्यान चालकाचा टेम्पोवरील ताबा सुटल्याने टेम्पो उलटल्याने अजय विश्वनाथ गुट्टे ( वय२१) ऋषिकेश नारायण केदार (वय२५) या दोघांना डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने जागीच मृत्यू झाला. रविवारी रात्री उशिरा सदरील अपघात झाला असून (ता.३) सोमवारी सकाळी सहा वाजता अपघाताची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे अंबलटेक या गावात शोककळा पसरली आहे.



माजलगाव:- हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे रिजनल मॅनेजर अमित कलंगुटकर व एरियल मॅनेजर प्रथमेश सोलापूरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयास भेट दिली असता त्यांचा सन्मान करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे, संचालक अमोल जाधव, नंदकिशोर सजगणे, लोणार अर्बनचे चेअरमन प्रवीण देशमुख, बाजार समितीचे सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे.

## संत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी-निमित्त नंदिनीताई महाराज यांचे किर्तन



पाटोदा । प्रतिनिधी

श्री संत मीराबाई आईसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार नंदिनीताई महाराज यांचे दिनांक ४ फेब्रुवारी मंगळवार रोजी श्री.क्षेत्र मीराबाई आईसाहेब संस्था महासांगवी या ठिकाणी अमृततुल्य असे किर्तन होणार आहे.तरी पाटोदा आणि पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या किर्तनाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन या सप्ताहाचे आयोजक श्री.क्षेत्र मिराबाई आईसाहेब संस्थांच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज (आईसाहेब) यांनी केले आहे. तरी पाटोदा आणि पाटोदा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या सर्व किर्तनाचा व शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा. समस्त ग्रामस्थ महासागवी कवडवाडी यांनी आव्हान केले आहे.

## चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचा शुभारंभ थाटामाटात संपन्न

बीड । प्रतिनिधी

रंगदेवताची पालखी सजवून, टॅक्टर, बैलगाडीवरून असंख्य बीडच्या कलाकारांनी एकत्रित येऊन आकर्षक अशी शोभयात्रा काढत चंपावती नगरीचे लक्ष वेधले. काल दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास बीडच्या इतिहासत अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्यानंतर चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलाकारांची शोभयात्रा पहिल्यांदाच निघाली. या शोभायात्रेत पारंपरिक कलाकार, असंख्य बाल कलाकार जेष्ठ कलाकार आणि कलाप्रेमी यांनी मिळून शिवातीर्थावर वंदन करून नटराजाची पालखी वाजवत गाजवत मोठ्या थाटामाटात नाट्यमंदिरात आणली आणि नटराजाचे पूजन करून चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे उदघाटन करून मोठ्या थाटामाटात शुभारंभ केला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी व्यापारी महासंघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री प्रमुख पाहुणे होते तर उदघाटक जेष्ठ कलाकार भरत अण्णा लोळगे उपस्थित होते. याबरोबरच दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दै वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ, कलाकार किशोर धुताडमाल, जतीन वाघामारे, सोनल नहार, संस्कार

पान २ वर




कलाकारांच्या शोभायात्रेने चंपावती नगरीचे लक्ष वेधले

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महाराष्ट्र केसरी आधीच ठरतो, पंचाला जन्मठेप द्या; अर्जुनवीर काका पवार संतापले



**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी कोण होणार? हे स्पर्धेच्या आधीचं ठरलं जातं, असा गंभीर आरोप शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाडचे वस्ताद अर्जुनवीर काका पवार यांनी केला. शिवराज राक्षे आणि महेंद्र यांच्यावर ३ वर्षे कुस्ती खेळण्याची बंदी घातली आहे. यावर बोलताना काका पवार म्हणाले की, पंचालाही जन्मठेप द्या. तसेच मी शिवराजच्या चुकीचं समर्थन करणार नाही असंही काका पवार म्हणाले.

यंदाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. उपांत्य सामन्यात पैलवान शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारली आणि शिवीगाळ केली. उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत हा गदारोळ झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळं या कुस्तीच्या आखाड्यात नेमकं राजकारण कोणी आणलं? यात राजकीय हस्तक्षेप वाढलाय का? यामुळं फक्त पैलवान संपवतोय की कुस्ती? पुढची तीन वर्षे शिवराज आणि महेंद्र कुस्ती खेळणार का? या प्रश्नांवर काका पवारांनी सडेतोड उत्तरं दिली.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या सामन्यात पंचांशी हुज्जत घालणं पैलवन शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाडला चांगलंच भोवलं आहे. या दोनही पैलवानांना तीन वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने (चरहरीरीहीर डींरींश थीशीींश्रळपस – ीीलळरींळेप) घेतला आहे. त्यामुळे पुढच्या तीन वर्षांसाठी या दोन्ही पैलवानांना कोणत्याही कुस्ती स्पर्धेत भाग घेता येणार नाही. राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष रामदास तडस यांनी ही माहिति दिली. यंदाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अभूतपूर्व गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. उपांत्य सामन्यात पैलवान शिवराज राक्षेने पंचांना लाथ मारली आणि शिवीगाळ केली. तर अंतिम सामन्यात पैलवान महेंद्र गायकवाड याने पंचांच्या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त करत मैदान सोडलं. त्यावेळी त्याने पंचांना शिवीगाळही केली. यानंतर राज्य कुस्तीगीर परिषदेची एक बैठक घेण्यात आली आणि त्यामध्ये या दोनही पैलवानांवर तीन वर्षांची बंदी घालण्यात आली.

# गुजरातच्या गोध्रा हत्याकांडातील गुन्हेगाराचा पुणे जिल्ह्यात धुमाकूळ; टोळीचा पर्दाफाश, विविध गुन्हे उघडकीस



पुणे । प्रतिनिधी

गुजरातच्या ग्रोधा हत्याकांडातील जन्मठेप झालेल्या गुन्हेगाराने पॅरोल रजेवर कारागृहाबाहेर आल्यानंतर महाराष्ट्र येउन टोळीच्या मदतीने ठिकठिकाणी चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. संबंधित टोळीकडून आळेफाटा, मंचर, सिन्नर पोलीस ठाण्यातंर्गत दाखल गुन्ह्याची उकल केली आहे. त्यांच्याकडून १४ लाख ४१ हजारांचा ऐवज जप्त केला आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पोलीस निरीक्षक दीनेश तायडे उपस्थित होते.

सलीम उर्फ सलमान युसूफ जर्दा (वय ५५), साहिल हनीफ पठाण (वय २१), सुफीयान सिकंदर चॅदकी (वय २३), आयुब इसाग सुनठीया (वय २९), इरफान अब्दुलहामीद दुरवेश (वय ४१, रा. गोध्रा गुजरात) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. आरोपी सलीम जर्दा हा गोध्रा हत्याकांडातील मुख्य आरोपी असून, त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. पॅरोल रजेवर असताना तो पुन्हा कारागृहात हजर न होता टोळी बनवून, चोरीचे गुन्हे करीत असल्याचे उघडकीस आले आहे. त्याच्याविरूद्ध विविध पोलीस ठाण्यात १६ गुन्हे दाखल आहेत. आळेफाटा पोलीस ठाण्याच्या हद्दीत टोळीने आणे परिसरात टेम्पो चालकाला लुटले होते. टेम्पोतून २२ ट्यूबटायर चोरून नेले होते. चालक झोपलेला असताना, ताडपत्री फाडून चोरट्यांनी चोरी केल्याचे उघडकीस आले.

# पर्यटकांना चांगली सेवा देऊन आर्थिक प्रगती साधावी –आ. शेळके



मावळ : पवना धरण परिसरात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यासह देशविदेशातील पर्यटक येत असतात. मागील काही वर्षांपासून या भागात पर्यटन व त्यावर अवलंबून असलेल्या व्यवसायाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. याठिकाणी येण्यासाठी चांगले सुसज्ज रस्ते, परिसरात वैद्यकीय सेवा सोबत पर्यटन वाढीसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या असुन पर्यटकांना चांगल्याप्रकारे सेवा देऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन आमदार सुनील शेळके यांनी केले.

पवना कृषी पर्यटन विकास संस्थेच्या वतीने कृषी पर्यटन व्यवसायिकांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुनील शेळके बोलत होते. मावळला मोठे निसर्ग सौंदर्य लाभले आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूमध्ये याठिकाणी गर्दी पाहायला मिळते. मावळच्या ग्रामीण संस्कृतीचे दर्शन यामुळे पर्यटकांना होत असते, असेही शेळके म्हणाले. याप्रसंगी पवना कृषी पर्यटन विकास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब मोहोळ, उपाध्यक्ष किसन खैरे, खजिनदार संजय मोहोळ, सचिव रवि ठाकर, संचालक दत्तात्रय ठाकर, नारायण बोडके, सुधीर घरदाळे, नारायण ठाकर, संतोष कडू आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय मोहोळ यांनी केले. आभार रवि ठाकर यांनी मानले.

चुकीचे वागल्यास पाठीशी घालणार नाही

पर्यटनात वाढ होत असताना आपल्या व्यवसायामुळे ध्वनी प्रदूषण होणार नाही, स्थानिकांना त्रास होणार नाही, याची खबरदार घ्यावी. प्लॅस्टिकचा वापर टाळावा, सांडपाणी व्यवस्थापन करावे, चांगली सेवा देण्याची स्पर्धा करावी. परिसरात धनदांडगे अलिशान बंगल्यात पर्यटन करत आहेत, यावर प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. गैरप्रकारांना रोखण्यासाठी पवना कृषी पर्यटन विकास संस्थेने घालुन दिलेल्या नियम अटींचे पालन करावे. चुकीचे वर्तन केल्यास कुणालाही पाठीशी घालणार नाही, असे मार्गदर्शन शेळके यांनी उपस्थितांना केले.

# वडिलांच्या मृत्यूनंतर बनावट स्वाक्षऱ्यांद्वारे त्यांच्या खात्यातून पैसे काढणाऱ्या मुलाला तुरुंगवास

पुणे – वडिलांच्या मृत्यूनंतर बनावट स्वाक्षऱ्याच्या आधारे त्यांच्या विविध बँक खात्यातून दहा लाख रुपये काढणाऱ्या मुलाला न्यायालयाने दहा महिने साधा कारावास आणि २९ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांनी हा निकाल दिला.

किसन नागू ओरसे (वय ४६, रा. पीएमसी कॉलनी, जनवाडी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत त्यांचा भाऊ अनिल नागू ओरसे यांनी न्यायालयात तक्रार अर्ज केला होता. अनिल ओरसे यांनी वडिलांच्या विविध बँकांकडून माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागविल्यानंतर भावाने रक्कम हडप केल्याचे दिसले. त्यांनतर या प्रकरणाबाबत भावाने आरोपी भावाविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांत अर्ज केला होता. मात्र पोलिसांनी त्यांची दखल न घेतल्याने त्यांनी न्यायालयात अर्ज सादर केला. त्यावर न्यायालयाने किसन विरोधात गुन्हा दाखल करून




तपासाचे आदेश चतु:श्रृंगी पोलिसांना दिले होते. त्यानंतर पोलिसांनी किसन विरोधात मृत व्यक्तीच्या मालमत्तेचा अपहार, फसवणूक, दस्तावेजांचे बनावटीकरण आदी कलमांनुसार गुन्हा दाखल करत आरोपपत्र दाखल केले होते. आरोपीने वडिलांची मुदत ठेव त्यांची बनावट स्वाक्षरी करून एक ऑगस्ट २००५ ला मोडली. मात्र आरोपीच्या वडिलांचा १७ जुलै २००५ ला मृत्यू झाला होता. सरकारी वकील विशाल मुरळीकर यांनी या खटल्यात गुन्हा सिद्ध करण्यासाठी सात साक्षीदार तपासले. हवालदार रमेश विधाते यांनी न्यायलयीन कामकाजात मदत केली केले.

**असा प्रकार करणाऱ्यांवर प्रतिबंध बसायला हवा**

आरोपीचा भाऊ आणि वहिनी, बँक ऑफ बडोदाच्या शिवाजीनगर शाखेचे व्यवस्थापक आणि बँक अधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या डेक्कन जिमखाना शाखेचे व्यवस्थापक यांची साक्ष, पोलिसांनी केलेला पंचनामा, हस्तलेखन तज्ज्ञांचा अहवाल, तसेच वडिलांचे दाखल केलेले मृत्यू प्रमाणपत्र आणि माहिती अधिकारांतर्गत मागविलेली माहिती महत्त्वाची ठरली. केवळ आरोपीच नव्हे तर असे कृत्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर देखील प्रतिबंध बसायला हवा असे न्यायालयाने निकालात नमूद केले आहे.

# अत्याचार प्रकरणात पोलीस शिपाई निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस शिपायाविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पाच लाख रुपये आणि दागिन्यांचा अपहार, तसेच विवाहास नकार दिल्याचा आरोप या शिपायाविरुद्ध आहे. त्याला पोलीस दलातून निलंबित करण्याचे आदेश परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल्ल यांनी दिले.




तुषार अनिल सुतार असे या शिपायाचे नाव आहे. तो खडक पोलीस ठाण्यात नियुक्तीस होता. फिर्यादी महिला, पती आणि मुलीसह शहरातील मध्यवर्ती भागात राहायला आहे. तिची २०१९ मध्ये पोलीस शिपाई तुषार सुतार याच्याशी समाज माध्यमात ओळख झाली. ओळखीतून त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. दरम्यान, महिलेच्या पतीला ही माहिती समजली. त्यामुळे त्याने पत्नीला घरातून बाहेर काढले. त्यानंतर सुतार, महिला आणि तिची मुलगी आंबेगाव परिसरात भाड्याने सदनिका घेऊन राहत होते. दरम्यान, तिच्या पतीचा मृत्यू झाल्याने तिने सुतारकडे विवाहाबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने टाळाटाळ सुरू केली. तिच्याकडून वेळोवेळी पैसे आणि दागिने घेतले. विवाहाबाबत विचारणा केल्याने तिला मारहाण केली. त्यानंतर महिलेने समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

# शिरूर बाह्य महामार्गावर पिस्तूलसह एकाला अटक; ४० हजारांची रोकड जप्त





शिरूर । प्रतिनिधी

शिरूर बाह्यमार्गावर दि नाना स्पॉट धाब्या जवळ कमरेला पिस्तूल लावून फिरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पुणे ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून, त्याच्याकडून एक पिस्तूल व एक जिवंत काडतूस असा ४० हजार पाचशे रुपयाचा ऐवज जप्त केला आहे. दिपक बबन गुंजाळ (रा. गोलेगाव रोड, शिरूर, ता. शिरूर जि. पुणे) या सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गुन्ह्याचा तपास करत असताना या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून माहिति मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार दीपक गुंजाळ हा कमरेला पिस्तूल लावून शिरूर बाह्य महामार्गावर बंद असलेल्या दी नाना स्पॉट धाब्याजवळ उभा आहे. अशी माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पथक यांनी दी नाना स्पॉट धाब्यावर सापळा रचून आरोपीला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेला एक गावठी पिस्टल व मॅग्झीनमध्ये एक जिवंत काडतुस असा एकूण ४० हजार ५०० रूपये किमतीचा ऐवज जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, प अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, शिरूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, शिरुर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजय जाधव, राजू मोमीन, मंगेश थिगळे, सागर माळ यांनी केली असून पुढील तपास शिरुर पोलीस स्टेशन करत आहे.

सात दिवसातली ही दुसरी कारवाई आहे.शिरूर शहरात गेल्या ७ दिवसापुर्वी किरण पवार ,साईनगर शिरूर याला बेकायदा पिस्टल वापरल्याप्रकरणी अटक केले होते. शिरूर शहरासह तालुक्यात अनेक जण बेकायदा पिस्टल वापरत असल्याची चर्चा वारंवार होत आहे. यासाठी पोलीस यंत्रणेने सतर्क राहून योग्य वेळी कार्यवाही करणे गरजेचे आहे. पोलिसांनी अशी अवैध पिस्टल बाळगणा –यांची माहीती घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# जीबीएसविरोधात प्रशासन ॲक्शन मोडमध्ये, आजाराबाबत करणार संशोधन, अधिकाऱ्यांनी दिली महत्त्वाची माहिती




पुणे । प्रतिनिधी

शहरात गेल्या काही दिवसांपासून गुलेन बारी सिंड्रोम जीबी या आजाराचे रुग्ण हे वाढत आहे. शहरात या आजाराचे १६३ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. तर ५ संशयित रुग्णांचा मृत्यू देखील झालं आहे. आज ५ नवीन रुग्ण आठळून आले आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढत असलेल्या या आजाराच्या बाबत नेमकं या वाढत्या आजाराची कारणे काय? याबाबत आत्ता पशूसंवर्धन विभागाच्या वतीने फक्त पाणी नव्हे तर विविध पक्षी, पोल्ट्रीफॉर्म आणि मातीचे सॅंपल घेऊन नेमकं हा आजार का वाढत आहे, याबाबत संशोधन करण्यात येत असल्याची माहिती आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार यांनी दिली आहे.

आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार म्हणाले की ९ जानेवारीपासून पुणे तसेच आजूबाजूच्या परिसरात जीबीएस चे रुग्ण हे आढळून येत आहे. आत्तापर्यंत शहरात या आजाराचे १६३ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. तर ५ संशयित रुग्णांचा मृत्यू देखील झालं आहे. यात महापालिका भागातील ३२ रुग्ण, तर नव्याने समाविष्ट झालेल्या भागातील ८६ रुग्ण, पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील १८ रुग्ण, पुणे ग्रामीण भागातील १९ रुग्ण, इतर जिल्ह्यातील ८ असे एकूण १६३ रुग्ण आढळून आले आहे.

तर १११ रुग्ण हे दवाखान्यात उपचार घेत आहे तर ४७ रुग्ण पूर्णपणे बरे होऊन त्यांचा डिस्चार्ज झाला आहे.जे १११ रुग्ण दवाखान्यात उपचार घेत आहे त्यातील ४७ रुग्ण आयसीयूमध्ये असून यातील २१ रुग्ण हे व्हेंटिलेटरवर आहे, अशी माहिती यावेळी पवार यांनी दिली. पुणे महापालिका,राज्य शासन, तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातून विविध पथकांच्या माध्यमातून पाण्याचे नमुने देखील तपासण्यात आले आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने देखील खडकवासला विभागातील जे पोल्ट्रीफॉर्म तसेच माती आणि पक्ष्यांच्या घश्यातील सॅंपल तसेच त्यांच्या विष्ट्यातील सॅंपल घेऊन या आजराच्या बाबत संशोधन करून नेमकं त्या परिसरात का रुग्ण वाढत आहे, याबाबत माहिती घेतली जात आहे. लवकरच याबाबत अहवाल देखील प्राप्त होणार आहे. अहवालाच्या नंतर नेमकं काय कारण आहे? हे देखील स्पष्ट होणार असल्याचं यावेळी डॉ. राधाकिसन पवार म्हणाले.

# पेपर विक्री प्रकरणात मोठी अपडेट; तिघांना अटक, मध्यप्रदेश कनेक्शनही उघड

पुणे: एमपीएससी पेपर विक्री प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत आणखी दोन जणांना अटक केली आहे. यातील एकाला महाराष्ट्रातून, तर दुसऱ्याला मध्य प्रदेशमधून ताब्यात घेण्यात आले. यापूर्वीच पोलिसांनी तिघांना अटक केली होती, त्यामुळे या प्रकरणातील अटक झालेल्यांची संख्या पाचवर पोहोचली आहे.

या टोळीने एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आधल्या रात्री प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवले होते. यासाठी त्यांनी तब्बल ४० लाख रुपयांची मागणी केली होती. या संदर्भातील फोन कॉलमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली होती. पुणे पोलिसांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवत या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) रविवारी ( २ फेब्रुवारी) घेतल्या गेलेल्या महाराष्ट्र गट ब संयुक्त पूर्व परिक्षेची प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत ४० लाखांची मागणीचे कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाले होते. या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासात दोघांना अटक केली आहे. योगेश सुरेंद्र वाघमारेला (२७ वर्षे) याला भंडारा जिल्ह्यातून तर दीपक यशवंत साकरेला (२७ वर्षे) याला मध्यप्रदेशातील बालाघाटमधून अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी परिक्षेपूर्वी



विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका पुरवण्याचे आमिष दाखवले होते. योगेश आणि दीपक यांनी परीक्षेपुर्वी काही विद्यार्थ्यांना फोन करून प्रश्नपत्रिका पुरवण्याचे आमिष दिले होते. या फोनची कॉल रेकॉर्डिंगही व्हायरल झाली होती. पोलिसांनी केलेल्या तपासाअंती आरोपींनी फोन केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करत या दोघांना अटक केली आहे.

# मायमराठी लोक प्रशासनाची भाषा व्हावी; 'प्रशासनातील मराठी भाषा' परिसंवादात सनदी अधिकाऱ्यांची भूमिका

पुणे: ''मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही मायमराठी ही लोक प्रशासनाची भाषा झाली पाहिजे यावर भर द्यावा. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करतानाच, जनतेचे प्रश्न सोडविण्याच्या कळकळीतून प्रशासनाची भाषा नक्कीच सुलभ होईल,'' असा विश्वास सनदी सेवेतील अधिकाऱ्यांनी शनिवारी (दि. १) विश्व मराठी संमेलनाच्या व्यासपीठावर व्यक्त केला.




विश्व मराठी संमेलनाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मुख्यमंचावर 'प्रशासनातील मराठी भाषा' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री कार्यालय आणि सांस्कृतिक विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, पुणे महापालिकेचे उपायुक्त राजीव नंदकर, वस्तू व सेवा कर पुणे विभागाच्या अतिरिक्त आयुक्त वैशाली पतंगे यांनी या परिसंवादात सहभाग घेत प्रशासनाच्या भाषेबाबत विचार मांडले. बालभारतीचे संपादक किरण केंद्रे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. विकास खारगे म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात फारसी भाषेऐवजी मराठी भाषेचा वापर सुरू केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजी भाषेला पर्यायी मराठी शब्द प्रचलनात आणले. त्यांचा वारसा चालविताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकांना समजेल अशी भाषा वापरून जनतेची सेवा केली पाहिजे. इतर भाशेतील शब्दांना पर्यायी मराठी शब्द नक्कीच प्रचलनात आणले जाऊ शकतात. मराठी भाषा विभागाने विविध कोष तयार करून भाषाविकासात योगदान दिले आहे.' अशोक काकडे म्हणाले की, 'केवळ प्रशासकीय अधिकारीच नव्हे, तर अनेक लोक अवघड शब्द वापरताना दिसतात. पर्यायी मराठी शब्द अनेकांना सुचत नाहीत. भाषेचे स्वरुप काळानुरूप वेगाने बदलत असून, सोपे पर्यायी शब्द सर्वांनी वापरले पाहिजेत. शब्दाचा अनर्थ होऊ नये, या विचारातून प्रशासनात क्लिष्ट भाषा वापरण्याचा प्रघात सुरू झाला. मात्र, आशय हा सोप्या शब्दांत, थोडक्यात मांडल्यास तो खूप लोकांपर्यंत पोहोचतो.' राजीव नंदकर यांनी संविधानिक भाषा, राजभाषा, राष्ट्रभाषा, प्रमाण भाषेच्या तरतुदींची माहिती दिली. 'राज्यघटनेच्या सतराव्या भागात राजभाषा आणि संघराज्याची भाषा याबाबत विवेचन केले आहे. त्या आधारे राजभाषा अधिनियम तयार करण्यात आला. त्यामध्ये केंद्र सरकारची राजभाषा हिंदी झाली, तर राज्यांना त्यांची राजभाषा ठरविण्याची मुभा देण्यात आली. त्या आधारे महाराष्ट्र राज्याने १९६५ मध्ये राजभाषा अधिनियम संमत करत मराठी ही राजभाषा आणि प्रमाण भाषा ठरविली. केंद्राने २००४ नंतर भाषांना अभिजात दर्जा देण्यास सुरुवात केली. त्यानंतर आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे,' असे त्यांनी सांगितले.